नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ७८ * * नागपूर * सोमवार, दिनांक १६ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## अहमदाबाद प्लेन क्रॅश- विजय रुपाणींचा डीएनए जुळला

■ महासागर प्रतिनिधी, अहमदाबाद, दि. १५ :


अहमदाबाद विमान अपघातात प्राण गमावलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचे डीएनए जुळले आहेत. त्यांचा मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात येईल आणि राजकोटमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील. या अपघातातील मृतांची संख्या २७५ वर पोहोचली आहे. रविवारी सकाळपर्यंत २४८ मृतदेहांचे डीएनए नमुने घेण्यात आले. त्यापैकी ३१ मृतदेह जुळले आहेत, त्यापैकी २० मृतदेह कुटुंबियांना सोपवण्यात आले आहेत. त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र देखील देण्यात आले आहे. रुग्णवाहिकांद्वारे मृतदेह सुरक्षिततेसह त्यांच्या गावी नेले जात आहेत. यासाठी २३० पथके तयार करण्यात आली आहेत, जी मृतांच्या नातेवाईकांशी थेट संपर्कात आहेत.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## कुंभोत्सव साजरा करा!

काही दिवसांपूर्वी आम्ही नाशिकला कार्यक्रमासाठी जाऊन आलो. नाशिकमध्ये २०२६-२७ मधील जो कुंभमेळा होणार आहे. त्या कुंभ मेळ्यासाठी जय्यत तयारी सुरू असेल, असे आम्हाला वाटले. मुद्दाम चौकशी केली. पण गंमत अशी की, अजून पर्यंत नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी कोणत्याही प्रकारचे व्यवस्थापन सुरू झालेले नाही. मागील वर्षी प्रयागराज येथे अतिशय मोठ्या प्रमाणावर कुंभमेळ्याचे नियोजन आणि व्यवस्था करण्यात आली होती, असे म्हणतात की त्यांची तयारी पाच वर्षांपूर्वीपासून सुरू होती. त्याउपर असेही म्हणतात की, कुंभमेळ्यामुळे उत्तर प्रदेश सरकारला कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. अनेकांसाठी हजार रुपये भाड्याच्या टेंट पासून कुंभमेळ्याच्या म्हणजेच सिंहस्थाच्या तयारीचे प्रत्यक्ष दर्शन पदोपदी होत होते. इथे आपल्या नाशिक क्षेत्री नाशिक की त्र्यंबकेश्वर यातच वाद सुरू झाला आहे. आखाडा परिषद, साधू महंत याबाबत चांगलीच बोंबाबोंब करीत होते. या सिंहस्थाच्या अमृत स्नानाच्या तारखा निश्चित होत नव्हत्या. या सर्व प्रकारामुळे आखाडा परिषद, साधू-महंत आणि पुरोहित संघ यांच्यात बरीच खडाजंगी झाल्याचे वृत्त कानी आले होते. खरे म्हणजे अमृत स्नानाच्या तारखा निश्चित करण्यात पुरोहित संघ आणि साधू-महंत यांचाच पुढाकार असतो. या सिंहस्थात किंवा कुंभमेळ्यात एकूण सहा वेळा अमृतस्नान होत असते. त्यातील तीन शैवांची व तीन वैष्णवांची अशी स्नानांची विभागणी असते. सिंहस्थ पर्वासाठी सरकार, पोलीस प्रशासन, त्यासह इतर यंत्रणाही सज्ज होणे गरजेचे असते. मुख्यमंत्र्यांनी अमृतस्नानाच्या तारखा जाहीर करणे. म्हणजे आखाड्यातील सुंदोपसुंदी चालू असल्याचे हे लक्षण आहे. आपल्या देशात हा कुंभमेळा नाशिकच्या नावाने प्रसिद्ध आहे. पण यावेळी त्र्यंबकेश्वर - नाशिक असे या सिंहस्थाचे नाव राहणार आहे. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी नाशिकपेक्षा त्र्यंबकेश्वरला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून आले असे म्हणता येईल. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे इतर ठिकाणच्या कुंभमेळ्याचे कार्य कितीतरी आधी सुरू होत असते. कुंभमेळ्याचे सर्व जगाला आकर्षण आहे. यासाठी मोठ्या नियोजनाची गरज असते. अनेक विकासकामे करावी लागतात. सध्या केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकाच पक्षाचे असल्यामुळे कुठेही अडचण येण्याची शक्यता नाही. कुंभ मेळ्यासाठी जवळजवळ २५ हजार कोटी रुपयांचे आराखडे तयार झाले. परंतु त्यावरही सरकारकडून अद्याप निर्णय झालेला नाही असे म्हणतात. आम्ही दहा ते बारा दिवसांपूर्वी नाशिक मध्ये होतो तोपर्यंत सरकारकडून दमडीही आली नव्हती. जवळजवळ सहा हजार कोटी रुपयांच्या सुरुवातीच्या कामांचा प्रारंभ ही न झाल्याचे सांगण्यात येते. गोदावरीच्या स्वच्छतेसाठी १५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची निविदा निघाल्याचे सांगतात. त्याला स्थानिक शिवसेनेने आक्षेप घेतलेला आहे, असे म्हणतात. तिकडे साधू - महंतांच्या निवासासाठी जी जमीन पाहिजे. त्या नियोजनाची अजून सुरुवातही झालेली दिसत नाही. प्रयागराजा प्रमाणे नाशिक राजाचे ही जबरदस्त आकर्षक व्यवस्थापन होईल, अशी अपेक्षा होती. परंतु उत्तर प्रदेश पेक्षा कित्येक पटीने श्रीमंत असलेल्या आणि पुढारलेल्या महाराष्ट्रात अजून सिंहस्थाच्या कार्यासाठी नियोजन समितीची घोषणाही करता आलेली नाही. त्या नियोजन समितीत साधु-संतांचा समावेश करावा. यासाठी जोरदार प्रयत्न चालू आहेत. पण तिथेही आलबेल आहे असे दिसत नाही. ज्या नाशिक क्षेत्री हा भव्य सोहळा होणार आहे. त्या जिल्ह्यासाठी प्रचंड बहुमत असलेल्या सरकारला अजून तरी साधा पालकमंत्री देता आलेला नाही. सिंहस्थ मेळ्याचा मेळ साधण्यासाठी सध्या गिरीश महाजन यांच्याकडे एकूण कारभार सोपवण्यात आलेला दिसतो. पण या जिल्ह्यातील बाकीचेही महत्त्वाचे लोकप्रतिनिधी या सिंहस्थ पर्वासाठी तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे, त्यांच्याकडेही महत्त्वाची कामगिरी सोपविणे गरजेचे आहे. या सिंहस्थाची धर्मध्वजा मतभेदांच्या आणि परस्पर अविश्वासाच्या ओज्याखाली कशी फडकवली जाईल, हाच खूप महत्त्वाचा प्रश्न आहे?. या सिंहस्थासाठी दहा ते पंधरा कोटी भाविक अत्यंत श्रद्धेने येणार आहेत. प्रयागक्षेत्री झालेल्या चेंगराचेंगरीत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली होती. तसा प्रकार शिस्तप्रिय आणि सर्वाधिक प्रगतीशील त्यासोबतच नियोजनवीर असलेल्या महाराष्ट्रात घडू नये किंवा तसा डाग लागू नये. अशी आमच्यासारख्या शुभ चिंतणाऱ्या आणि श्रद्धाळू माणसांची अपेक्षा आहे. प्रयागराज येथे ज्या प्रकारची महागडी व्यवस्था करण्यात आली होती. तशी व्यवस्था झाली नाही. तरी निदान पाहुणे क्रमांक- एक म्हणजे व्हीव्हीआयपी, पाहुणे क्रमांक- दोन म्हणजे व्हीआयपी, पाहुणे क्रमांक- तीन म्हणजे आयपी आणि पाहुणे क्रमांक- चार म्हणजे पी म्हणजेच सर्वसामान्य जनता या सर्वांनाच सोयी सवलतीने कुंभ पर्वाचे स्नान करता येईल. अशी व्यवस्था होणे गरजेचे आहे. नाशिकमधील मागील कुंभमेळ्यामध्ये अतिसुरक्षेमुळे सर्वत्रच अतिनाराजी झाली होती. त्यामुळे यावेळी सुद्धा नाशिक शहरात स्थानिक जनतेत अतिशय उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या राज्यातील कुंभमेळ्याला जागतिक प्रसिद्धी मिळवून दिली होती. कोणे एकेकाळी संपूर्ण देशातील अनेक भागांवर मराठी ध्वजा उंचावणाऱ्या महाराष्ट्राला आपल्या महाराष्ट्राचा झेंडा निर्वेधपणे फडकावून दाखवण्याची या सिंहस्थाच्या निमित्ताने संधी आहे. अशा या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कुंभात नियोजनाची गंगा ओतून, गोदावरीच्या तटावरील हा कुंभमेळा यशस्वी करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जनतेने करावा. तो निर्धार निर्विघ्नपणे सफल व्हावा. सर्वांनी कुंभोत्सव साजरा करावा, एवढीच आमची मनोकामना आहे.



nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पुण्याच्या कुंडमळात इंद्रायणीवरील पूल कोसळून दोन ठार



* ६ जणांना वाचवण्यात आले
* ३८ जणांचा शोध सुरू

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १५ :

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील मावळ तहसीलमधील कुंडमाळा गावाजवळ रविवारी दुपारी ३:३० वाजता इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या मते, ३८ लोक बेपत्ता आहेत.

आमदार सुनील शेळके म्हणाले की, आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये मुलांचाही समावेश आहे. तथापि, मुख्यमंत्री फडणवीस आणि पुणे झोन २ च्या डीसीपींनी २ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. ६ जणांना वाचवण्यात आले आहे.

नदीचा जोरदार प्रवाह पाहण्यासाठी अनेक लोक उभे असताना हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक पोलिस, ग्रामस्थ आणि आपदा मित्र यांनी घटनास्थळी धाव घेतली असून बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. दोन दिवसांपासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस कोसळत असून इंद्रायणीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. यामुळे नदीत पडलेल्या पर्यटकांना वाचवण्याचे शर्तीचे प्रयत्न यंत्रणांकडून सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा पूल आधीच खूपच वाईट आणि जीर्ण अवस्थेत होता. अपघाताच्या वेळी पुलावर क्षमतेपेक्षा जास्त पर्यटक होते. लोक दुचाकी आणि मोटारसायकली घेऊन जात होते. त्यामुळे पुलाला भार सहन होत नव्हता. कुंडमळा हे पुण्यापासून सुमारे ३० किमी अंतरावर आहे. मुंबईकडे जाताना, एक्सप्रेस वेवर प्रवेश करण्यापूर्वी हे ठिकाण लागते.

(अधिक बातमी पान २ वर)

### वाहून गेलेल्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



पुण्यातील मावळमधील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याची घटना रविवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घडली आहे. २५-३० पर्यटक वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामध्ये अनेक लहान मुले आहेत. तर ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली आहे. या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला असून, आतापर्यंत सहा जणांना वाचवण्यात आले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत कुंडमळा येथील घटनेतील मृत आणि जखमी व्यक्तींबाबत माहिती दिली. ते म्हणाले, पुणे जिल्ह्यातील तळेगावनजीक इंदोरी येथे इंद्रायणी नदीवरील एक पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेचे वृत्त ऐकुन अतिशय दुःख झाले.

### कुंडमळा-मावळ येथील पूल दुर्घटना अत्यंत दुर्दैवीः उपमुख्यमंत्री अजित पवार



मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेली दुर्घटना दुर्दैवी, वेदनादायी असल्याचे सांगत या दुर्घटनेच्या कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. दुर्घटनेत काही नागरिक व पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, स्थानिक प्रशासनाने तात्काळ दुर्घटनास्थळी पोहचून बचाव आणि मदतकार्य सुरू केले. जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दलही दुर्घटनेनंतर अल्पावधीतच घटनास्थळी पोचले असून त्यांनीही बचाव व मदतकार्यास सुरुवात केली आहे.

# केदारनाथजवळ हेलिकॉप्टर कोसळून ७ ठार



■ वृत्तसंस्था, डेहराडून, दि. १५ :

रविवारी पहाटे ५:२० वाजता केदारनाथजवळील गौरीकुंड येथे एक हेलिकॉप्टर कोसळले. यामध्ये पायलटसह सर्व ७ प्रवाशांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका २ वर्षाच्या मुलाचाही समावेश आहे. या दुर्घटनेत वणी, यवतमाळ येथील जैस्वाल कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला.

हे हेलिकॉप्टर केदारनाथ मंदिरातून गौरीकुंडला भाविकांना घेऊन गेले होते. प्राथमिक माहितीनुसार, खराब हवामानामुळे हा अपघात झाला. हे हेलिकॉप्टर आर्यन एव्हिएशन कंपनीचे आहे.

उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विकास प्राधिकरण नुसार, हेलिकॉप्टरमध्ये उत्तर प्रदेश-महाराष्ट्रातील प्रत्येकी २ आणि उत्तराखंड, राजस्थान, गुजरातमधील प्रत्येकी १ प्रवासी होता. गौरीकुंड येथून बचाव पथके रवाना करण्यात आली आहेत.

चारधाम यात्रा हेलिकॉप्टर सेवेवर बंदी घालण्यात आली आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले- हेली सेवेच्या संचालनासाठी कठोर एसओपी तयार केली जाईल. यामध्ये, उड्डाणापूर्वी हेलिकॉप्टरची तांत्रिक स्थिती तपासणे आणि हवामानाची अचूक माहिती घेणे बंधनकारक केले जाईल. ७ जून रोजी उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग येथे तांत्रिक बिघाडामुळे एका हेलिकॉप्टरचे रस्त्यावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. यादरम्यान, हेलिकॉप्टर कारवर पडताच त्याचा मागील भाग तुटला. कारचेही पूर्णपणे नुकसान झाले. महामार्गावर बांधलेल्या एका दुकानाचा टिन शेड देखील हेलिकॉप्टरच्या ब्लेडने उडून गेला. यादरम्यान, दुकानात बसलेले लोक पळून गेले आणि त्यांचे प्राण वाचवले.

### यवतमाळ जिल्ह्यातील दाम्पत्यासह चिमुरडी ठार



केदारनाथजवळील गौरीकुंड येथे एक हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना घडली. यामध्ये पायलटसह सर्व ७ प्रवाशांचा मृत्यू झाला. मृतकांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील वणीच्या तिघांचा समावेश आहे. आज सकाळी ५:१७ वाजता, आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने केदारनाथ हेलिपॅडवरून गुप्तकाशीसाठी ६ भाविक आणि पायलटसह उड्डाण केले होते. खराब हवामानामुळे, हेलिकॉप्टर जंगलात कोसळले. हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला ज्यामुळे सातही जणांचा मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे या अपघातात महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याच्या वणीतील जयस्वाल दाम्पत्यासह २ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला. केदारनाथ येथे झालेल्या हेलीकॉप्टर दुर्घटनेत वणीतील तिघांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताने यथे खळबळ उडाली आहे. वणीतील मृतकात राजकुमार जयस्वाल (४१), श्रद्धा जयस्वाल (३२) व काशी जयस्वाल (२ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत.

### खासगी बस आणि ट्रकची समोरासमोर धडक

# तिघांचा मृत्यू, ८ जखमी



■ महासागर प्रतिनिधी, अहिल्यानगर, दि. १५ :

संगमनेर तालुक्यात रविवारी पहाटेच्या सुमारास खासगी ट्रॅव्हल्स बस आणि ट्रकमध्ये भीषण अपघात झाला. कोकणगाव शिवारातील कोल्हार-घोटी राज्यमार्गावर ही घटना घडली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर सात ते आठ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा चेंदामेंदा झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, एक खागगी ट्रॅव्हल्स शिर्डीकडे जात होती. कोकणगाव शिवारात निझर्णेश्वर महादेव फाट्याजवळ आल्यानंतर समोरून येणाऱ्या आंब्याची वाहतूक करणाऱ्या एका ट्रकसोबत जोरदार धडक झाली. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला असून, सात ते आठ जण जखमी झाले आहेत. अपघाताची भीषणता इतकी होती की, ट्रक आणि ट्रॅव्हल्सच्या पुढील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला.

या भीषण अपघातात प्रवीण सोपान कांदळकर (वय २८, राहणार सुकेवाडी, संगमनेर), फिरोज लाला शेख (वय ४६ राहणार कासारा दुमला, संगमनेर), अंजुम प्रवीण वालमीकी (वय ३९, पानिपत हरियाणा) यांचा मृत्यू झाला आहे. तर हर्षिता सोनु वाल्मीक, पूनम बिर्ला, सोनिया बिर्ला, रिया चावरिया, ऐश्वर्या चंद्रशेखर पाटील, लता सुरेश चक्रनारायण (सर्व राहणार मुंबई), प्रथमेश राजेंद्र कोल्हे (पोहेगाव, ता. कोपरगाव), मोहम्मद रफिक शेख (नाईकवाडापुरा, संगमनेर) हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर संगमनेर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### शिवसेना सोडून गेलेल्यांना जागा दाखवण्याची वेळ

## उद्धव ठाकरेंच्या शाखा प्रमुखांना सूचना

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना तयारीला लागली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील सेना भवन येथे शाखा प्रमुखांची बैठक पार पडली. शिवसेना सोडून गेलेल्यांना जागा दाखवण्याची वेळ आहे. सर्व कार्यकर्त्यांनी अंग झटकून कामाला लागावे, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी शाखा प्रमुखांना या बैठकीत केल्या आहेत.

मुंबई महापालिका हा ठाकरेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जातो. मागील २० ते २५ वर्षांपासून पालिकेवर ठाकरेंच्या शिवसेनेचे वर्चस्व राहिलेले आहे. मात्र, मागील विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेला मिळालेला जनाधार पाहता यंदाची मुंबई महापालिकेची निवडणूक उद्धव ठाकरेंसाठी प्रतिष्ठेची असणार आहे. महापालिका निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढायच्या की नाही, हे अद्याप ठरलेले नाही. त्यातच ठाकरे गट महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीला लागल्याचे या बैठकीतून दिसून आले.

मुंबईतील शिवसेना भवनात रविवारी पक्षाच्या शाखा प्रमुखांची बैठक पार पडली. या बैठकीला ठाकरे सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन करताना मोठी घोषणा केली.



येत्या काळात शाखा प्रमुखांनी अंग झटकून कामाला लागावे. त्यासाठी दररोज ३०० घरातील मतदारांची भेट घेण्याचे लक्ष्य ठेवावे. त्यानुसार दिवसभराच्या कामाचे नियोजन करावे. त्यासोबतच पक्षाने केलेले काम या मतदारांची भेट घेऊन त्यांच्यापर्यंत पोचवावा. त्यामुळे निवडणूक काळातील सर्व कामे आतापासून पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना उद्धव ठाकरेंनी शाखा प्रमुखांना दिल्या आहेत. आगामी काळात होत असलेल्या निवडणुकीसाठी सर्वांनी एकदिलाने कामाला लागण्याच्या सूचना करताना उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या संघटना बांधणीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचेही स्पष्ट केले. शाखा प्रमुखांनी कामाचे नियोजन करीत असताना त्यांच्याकडील काही जबाबदारी शाखा समनव्यकाकडे पोहचवावी. त्यासोबतच प्रभागातील प्रत्येकाशी सर्वांशी संपर्क ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

## मथुरेत ८ घरे अचानक कोसळली १२ जण दबले

■ वृत्तसंस्था, मथुरा, दि. १५ :

रविवारी मथुरा येथे एक मोठी दुर्घटना घडली. गोविंद नगर परिसरात अचानक ८ हून अधिक घरे कोसळली. त्याखाली १२ हून अधिक लोक गाडले गेले. अपघातानंतर परिसरात चेंगराचेंगरी झाली. काय झाले हे लोकांना समजले नाही. जवळच्या लोकांच्या माहितीवरून महानगरपालिका, प्रशासन आणि अग्निशमन दलाची टीम पोहोचली आहे. बचावकार्य सुरू आहे.

बचाव कार्यादरम्यान, लोकांनी घराच्या ढिगाऱ्याखाली गाडलेल्या तरुणाला बाहेर काढले आणि जिल्हा रुग्णालयात नेले. जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तोताराम (३८) असे या तरुणाचे नाव आहे. तो बजरंग लाल सैनी यांचा मुलगा आहे.

ही सर्व घरे मातीच्या ढिगाऱ्यावर बांधली गेली होती. अचानक माती कोसळली. त्यानंतर घरे कोसळू लागली. बहुतेक घरांची छप्परे आणि भिंती तुटल्या. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, भूकंप झाल्यासारखे वाटले.

एका क्षणात एकामागून एक ८ घरे कोसळली. आत असलेल्या लोकांना बाहेर पळून जाण्याचीही वेळ मिळाली नाही. ढिगाऱ्याखाली किती लोक गाडले गेले याची नेमकी संख्या अद्याप कळलेली नाही. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की सध्या ढिगारा काढण्याचे काम सुरू आहे. ज्यांची घरे कोसळली आहेत त्यांच्या कुटुंबियांना बेपत्ता लोकांबद्दल विचारणा केली जात आहे. ही दुर्घटना दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. त्यामुळे बहुतेक लोक त्यांच्या घरात होते.

### वीज कोसळून १० जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :

शनिवारी रात्रीपासून दिल्ली आणि संपूर्ण एनसीआरमध्ये मुसळधार पाऊस, वादळ आणि ताशी ८०-१०० किमी वेगाने वाहणारे जोरदार वारे अनुभवण्यात येत आहेत. अनेक भागात पाणी साचले आहे आणि झाडे उन्मळून पडली आहेत. हवामान खात्याने लोकांना घरात राहण्याचे आवाहन केले आहे. आज राजस्थानातील सर्व २५ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. शनिवारीही गंगानगर, चुरू, बिकानेरसह अनेक जिल्ह्यांमध्ये हवामान बदलले आणि मुसळधार पाऊस पडला. कोटा येथे वादळ आणि पावसामुळे एका घराची बाल्कनी कोसळली. या अपघातात १७ जण जखमी झाले. त्याच वेळी जयपूरच्या जमवरमगड येथे वादळामुळे एका दुचाकीस्वारावर विजेचा खांब कोसळला. या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला.

दुसरीकडे, शनिवारी मध्य प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार वादळ आले. उज्जैनमध्ये रेल्वे रुळावर झाड पडल्याने अनेक गाड्यांवर परिणाम झाला. दुसरीकडे, नीमचमध्ये एक टिन शेड उडून गेला. हवामान विभागाने रविवारी भोपाळ आणि इंदूरसह ४७ जिल्ह्यांमध्ये जोरदार वादळासह मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे.

## विश्वगंगा नदीत आठ भाविक बुडाले, मायलेकीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १५ :

नांदुरा तालुक्यातील निंबोळा देवी संस्थान येथे दर्शनाकरिता गेलेल्या आठपैकी दोन भाविकांचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये मायलेकीचा समावेश आहे. खामगाव परिसरातील सुटाळपुरा येथील आठ भाविक नांदुरा तालुक्यातील नींबोळा देवी संस्थान येथे आले होते. यामध्ये दोन पुरुष आणि सहा महिलांचा समावेश होता.

विश्वगंगा नदीच्या काठी पूजेपूर्वी स्नान करण्यासाठी आठही भाविक नदीत उतरले. मे महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने आणि जून महिन्यात मागील तीन-चार दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे नदीपात्रात भरपूर पाणी आहे. या आठ भाविकांपैकी दोघींना नदीतील खोल पाण्याचा अंदाज आला नाही. तसेच पोहणे येत नसल्याने त्या मायलेकी खोल पाण्यात बुडाल्या. सोबतच्या भाविकांनी त्यांना बचावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात अपयश आले.

पूनम मयूर जामोदे (३२) व आर्वी मयूर जामोदे (५), अशी मृत मायलेकीची नावे आहेत. उर्वरित सहा भाविक सुखरूप बचावले आहेत. त्यांच्यावर बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आल्याचे समजते. याप्रकरणी नांदुरा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

या घटनेमुळे देवी संस्थान परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची वार्ता येऊन धडकताच खामगाव सुटाळा परिसरात व जामोदे कुटुंबात एकच आकांत उसळला. नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. नांदुरा पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले.

# मणिपूरमध्ये ३२८ शस्त्रे आणि दारूगोळा जप्त

■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. १५ :

मणिपूरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या संयुक्त शोध मोहिमेत, ३२८ शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. यामध्ये सेल्फ लोडिंग रायफल्स (रछफ) आणि कठरअर सारख्या रायफल्सचा समावेश आहे.

मणिपूर पोलिसांचे एडीजीपी ल्हारी दोरजी ल्हाटू म्हणाले की, १३-१४ जूनच्या मध्यरात्री पोलिस, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ), लष्कर आणि आसाम रायफल्सच्या संयुक्त पथकाने पाच जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. यामध्ये १५१ एसएलआर रायफल्स, ६५ आयएनएसएएस रायफल्स, सहा एके सिरीज रायफल्स, दोन अमोघा रायफल्स, एक एआर-१५ रायफल, पाच कार्बाइन गन, दोन एमपी५ गन, १२ लाईट मशीन गन (एलएमजी), सहा पिस्तूल आणि इतर युद्ध साहित्य जप्त करण्यात आले.

# भाऊबंदकी की भावबंधन?

**मुंबई:** मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२५ जवळ येत असताना राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. विशेषत: ठाकरे कुटुंबातील दोन नावे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पुन्हा एकत्र येणार का? या प्रश्नाने राजकीय वतुर्ळात चुरस निर्माण झाली आहे. याच दरम्यान, राज ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झालेली भेट चर्चेचा केंद्रबिंदू ठरली असून, संभाव्य युतीच्या शक्यतांना तातडीचा झटका बसला आहे. आतापर्यंत अनेकांनी मनापासून 'भावबंधन' व्हावे अशी आशा व्यक्त केली, पण भाजपने राज ठाकरे यांच्यासोबतचा संवाद वाढवून 'भाऊबंदकी'ची शक्यता अधोरेखित केल्याचे संकेत राजकीय निरीक्षक देत आहेत.

**शिवसेना ठाकरे गटाची बैठक, निवडणुकीच्या तयारीचा धडाका**

आज सेनाभवनात उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली शाखाप्रमुख व उपशाखाप्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकीचा ग्राउंड रिपोर्ट, प्रभागनिहाय ताकद, कार्यकर्त्यांचे मनोबल आणि शक्य उमेदवारांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना खासदार संजय राऊत म्हणाले, 'राज आणि उद्धव ठाकरे एकत्र यावेत, अशी आमची अजूनही आशा आहे. महाराष्ट्राचे हित एकत्र येण्यातच आहे.' मात्र, तेवढ्याच निर्धाराने ते म्हणाले, 'जरी युती झाली नाही तरी शिवसेना आपले बस्तान पुन्हा मजबूत करणार आहे.'

**राजफडणवीस भेट: कोणता नवा खेळ सुरु होतोय?**

राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील अचानक भेटीमुळे राजकारणात नवा रंग भरला आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत उद्धव-राज युतीच्या चर्चांनी जोर घेतलेला असताना, राज यांनी थेट भाजपशी संपर्क साल्याने 'मविआतून' दूर जाण्याची शक्यता अधिकच बळावली आहे.

भाजपचीही ही एक चतुर खेळी असल्याचे म्हटले जात आहे, कारण ठाकरे-राजयुती झाल्यास त्याचा थेट फटका भाजपच्या मतविभाजनावर होऊ शकतो. त्यामुळे राज यांना वेगळे ठेवण्याची ही एक रणनीती असू शकते, असा काही राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

# हिंमत असेल तर सिंचन घोटाळ्याची फाईल बाहेर काढून दाखवा



**ठाणे :** सिंचन घोटाळ्याची फाइल कुठे अडकली असेल ती त्यांनी बाहेर काढावी. हे त्यांना खुले चॅलेंज आहे. आम्ही देखील पुढील सात दिवसांमध्ये आपली गुन्हेगारी प्रवृत्ती, रायगड मध्ये केलेले आर्थिक घोटाळे, सभापती असताना जिल्हा परिषद मध्ये केलेले घोटाळे बाहेर काढू असा इशारा राष्ट्रवादीचे नेते (अजित पवार गट) आनंद परांजपे यांनी शिंदे सेनेला दिला. शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांच्या विधाननंतर अजित पवार गटाचे नेते आनंद परांजपे यांनी त्यांच्यावर टीका केली. रायगड मधल्या 'श्री इडियट्स' मधल्या एका 'इडियट्स'ने पुन्हा एकदा राष्ट्रवादीचे प्रांताध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्याविरुद्ध गरळ ओकली. खरंतर रायगड मधील पालकमंत्री पदासाठी हापापलेल्या शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांची राजकीय अपरिपक्वता आणि माणूस म्हणून संवेदनशीलता गेलेली आहे असा टोला परांजपे यांनी गोगावले यांना लगावला. सुनील तटकरे यांच्या घरामध्ये दुःख आल्यानंतर ते अद्याप संपूर्ण कुटुंब त्यातून निघाले नाही. तटकरे यांच्यावर टीका करणे हा एक कलमी कार्यक्रम या 'श्री इडियट्स'कडून सुरु आहे. विधानसभेत देखील तटकरे युती धर्माचे पालन केले. मात्र केले नसते तर भरत गोगावले काय दोन उमेदवार पडले असते अशी टीका देखील त्यांनी केली. सिंचन घोटाळ्याची फाइल कुठे अडकली असेल ती त्यांनी बाहेर काढावी. हे त्यांना खुले चॅलेंज आहे. आम्ही देखील पुढील सात दिवसांमध्ये आपली गुन्हेगारी प्रवृत्ती, रायगड मध्ये केलेले आर्थिक घोटाळे, सभापती असताना जिल्हा परिषद मध्ये केलेले घोटाळे बाहेर काढू असेही ते म्हणाले.

## भावी सूनबाई भासवून वृद्धेची ६८ लाखांना फसवणूक

**ठाणे :** मुलासाठी वधू शोधणे एका ६८ वर्षीय महिलेला महाग पडले. विवाह जुळिवणाऱ्या संकेतस्थळावरून एका तरुणीशी ओळख झाल्यानंतर तिने कूट चलनाच्या (क्रिप्टो करन्सी) नावाखाली वृद्धेची ऑनलाईनरित्या ६८ लाख रुपयांना फसवणूक केली आहे. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फसवणूक झालेली महिला ठाण्यात राहते. त्यांच्या मुलाचे विवाह करण्यासाठी त्यांनी विवाह जुळिवणाऱ्या संकेतस्थळ तसेच फेसबुक खात्यांवर त्याची थोडक्यात माहिती दिली होती. ही माहिती पाहून २०२३ मध्ये एका तरुणीने त्यांना मोबाईल क्रमांकाद्वारे संपर्क साधला. तसेच त्यांची माहिती तिने विवाह जुळिवणाऱ्या संकेतस्थळावर मिळाल्याचे सांगितले. तिने वराच्या शोधात असल्याचे सांगितल्याने वृद्धेला तिच्यावर विश्वास बसला. वृद्ध महिला तिच्या सोबत समाजमाध्यमावर चॅटींग, मोबाईल क्रमांकावर संवाद साधत असे. परंतु तरुणी कधीही त्यांच्यासोबत व्हिडीओ कॉलवर बोलत नसे. काही महिन्यांनी त्या तरुणीने वृद्धेला सांगितले की, माझा भाऊ कूट चलनात गुंतवणूक करतो. त्याद्वारे जादा परतावा मिळतो. वृद्धेला तरुणीवर विश्वास बसल्याने तिने सुरुवातील पैसे गुंतविले. त्यात तिला चांगला परतावा मिळाला. त्यानंतर तिने टप्प्याटप्प्याने तिच्याकडे ६८ लाख रुपयांची ऑनलाईनरित्या गुंतवणूक केली. परंतु तिला कोणताही परतावा मिळत नव्हता. याबाबत तिने मुलाला सांगितल्यानंतर हा फसवणूकाचा प्रकार असल्याचे तिच्या लक्षात आले. वृद्धेने याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्याआधारे, गुन्हा दाखल झाला आहे.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी आनंदाचा उत्सव

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :** राज्यातील आदिवासी भागातील शैक्षणिक नवचैतन्याला चालना देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. येत्या १६ जून २०२५ रोजी सर्व शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, या निमित्ताने नव्या शैक्षणिक वर्षाची रंगतदार सुरुवात होणार आहे. या दिवशी प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार असून, पहिलाच दिवस त्यांच्या मनात आनंद, आत्मीयता आणि प्रेरणा निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी व्यक्त केला. डॉ. वुईके म्हणाले, 'राज्यात ४९७ शासकीय व ५५४ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. नाशिक व ठाणे विभागातील शाळा १६ जूनपासून सुरु होतील, तर नागपूर व अमरावती विभागातील शाळा ३० जूनपासून सुरु होतील.' मुंडेगाव येथील शाळेत प्रवेशोत्सवासाठी ते स्वतः उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आश्रमशाळांमध्ये 'परिचारिका' शैक्षणिक गुणवत्तेसोबतच आरोग्याचाही विचार करून, प्रत्येक शासकीय आश्रमशाळेत परिचारिका (नर्स) नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्या तात्काळ हाताळल्या जातील. या परिचारिका प्राथमिक उपचार, आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला देतील, त्यामुळे शाळांमध्ये आरोग्यसाक्षरतेचे वातावरण निर्माण होईल. 'पवित्र पोर्टल'मुळे शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षक भरती आता 'पवित्र पोर्टल'द्वारे होणार आहे. यामुळे ढएढ उत्तीर्ण, पात्र शिक्षकच निवडले जातील, आणि शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल. हा निर्णय आदिवासी विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल असल्याचे डॉ. वुईके यांनी सांगितले. 'राघोजी भांगरे गुणगौरव पुरस्कार' विद्यार्थ्यांना मिळणार सन्मान इयत्ता १०वी व १२वी मध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'राघोजी भांगरे गुणगौरव पुरस्कार योजना' सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत राज्य व विभागीय स्तरावर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

# पुण्यातील कुंडमळ्यात पूल कोसळला
# २० ते २५ जण बुडाल्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी, पिंपरी-चिंचवड, दि. १५ :**





पुण्यातील मावळमध्ये कुंड मळ्यात पूल कोसळल्याने काही पर्यटक बुडाल्याची माहिती मिळत आहे. ही घटना साडेतीनच्या सुमारास घडल्याचं सांगण्यात येत आहे. घटनास्थळी पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तळेगाव दाभाडे पोलीस दाखल झाले आहेत. कुंडमळा ओलांडण्यासाठी, या बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी पूल आहे. हाच पूल कोसळला आहे.

मावळ मधील कुंडमळा हा पर्यटन स्थळांपैकी एक आहे. आज रविवार सुट्टीचा दिवस असल्याने अनेक पर्यटक त्या ठिकाणी गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पर्यटकांची संख्या पूलावर जास्त झाल्याने हा पूल कोसळल्याच बोललं जात आहे. अद्याप कुंड मळ्यात किती पर्यटक बुडाले आहेत. याबाबत अद्याप आकडा स्पष्ट होऊ शकला नाही. २० ते २५ जण बुडाल्याची भीती व्यक्त होत आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, मावळ वन्यजीव रक्षक यांची टीम पोहचली आहे. बचावकार्य सुरू आहे.

# अवैधरित्या गांजाची वाहतुक करणाऱ्या दोन आरोपींना अटक

## सात लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त



**महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. १५ :** पालघर जिल्हयातील अवैद्य धंदयाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पालघर पोलीस सरसावले आहेत. अंमली पदार्थ विरोधात पालघर पोलिसांनी सुरू केलेल्या कठोर मोहिमेअंतर्गत विक्रमगड येथे मोठ्या प्रमाणात गांजाची वाहतूक उघडकीस आली आहे. स्थानिक गुन्हे शाखा पालघर व विक्रमगड पोलीस ठाणे यांच्याकडून करण्यात आलेल्या गुप्त कारवाई दरम्यान गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सुमारे सात लाख पाच हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पालघर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी अधीक्षक पदाचा कारभार सांभाळल्यापासून जिल्ह्यात अवैध धंदे पूर्णपणे बंद करण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना सक्त सुचना दिलेल्या आहेत. जिल्हयातील अवैद्य धंदयाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करणे, गैरधंद्यांबाबत माहिती मिळताच छापा टाकून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. १३ जून रोजी रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास गुप्त बातमीदाराकडून गांजा वाहतुकी बाबत माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदिप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व अमंलदार यांच्या पथकाने विक्रमगड पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांच्या मदतीने विक्रमगड-जव्हार रोडवरील यशवंतनगर गावाच्या हद्दीत सापळा रचला. यावेळी जव्हार बाजुकडून आलेली चारचाकी गाडी थांबवून तिची तपासणी केली असता त्यात सतिश लक्ष्मण वाघ (५२), सागर सोमनाथ बलसाने (२९) राहणारे नाशिक यांच्या ताब्यातील गाडीच्या डिक्कीत २,०५,१६० रुपये किमतीचा १०.२५८ किलोग्रॅम वजनाचा गांजा आढळला. यावेळी पोलिसांनी गाडीसह गांजा असा एकुण ७,०५,१६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. याबाबत विक्रमगड पोलीस ठाणे येथे १४ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपींना १७ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास विक्रमगड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित गोळे हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक प्रदिप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वानखेडे, गोरखनाथ राठोड, भगवान पाटील, पोलीस हवालदार व अंमलदार पथकाने पार पाडली.

## वीज पडून चौघांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने आता शेतकऱ्यांमध्ये लगबग सुरू झाली आहे. दरम्यान वीज पडून चार जणांचा मृत्यू झाला. यामध्ये दोन भावांचा समावेश आहे. सिल्लोड तालुक्यातील मौजे सारोळा येथे यश राजू काकडे (वय १४) व रोहित राजू काकडे (वय २१) या दोन भावांचा शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास वीज कोसळून मृत्यू झाला. तसेच मोढा बु. येथील रंजना बापूराव शिंदे (वय ५०) आणि शिवाजी सतीश गव्हाणे यांचाही वीज पडून मृत्यू झाला आहे. शनिवारी दिवसभर अनेक भागांत ढगाळ वातावरण होते.

अनेक ठिकाणी पावसाच्या मोठ्या सरी पडून गेल्या. काही भागांत मुसळधार पाऊस झाला. नांदेड व हिंगोली जिल्ह्यात पावसामुळे केळी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. नांदेडचे वार्ताहर कळिवतात की, जिल्ह्यात ९ जून रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासहित पाऊस बरसल्याने केळीसकट सर्वच फळबागांना तडाखा बसला. केळी बागांचे नुकसान झाले असताना बाजारात केळीचे दरही गडगडले.

# शाकाहारी मांसाहारी पदार्थात वेगळी प्रक्रिया

शाकाहारी मांसाहारी पदार्थात प्रक्रिया वेगळी

## नियमांचे उल्लंघन तर थेट कारवाई
## एफडीए आयुक्तांचा व्यवसायिकांना इशारा

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :** हॉटेल रेस्टॉरंट मध्ये यापुढे शाकाहारी मांसाहारी पदार्थांची संपूर्ण प्रक्रिया वेगळी असणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार पदार्थावर प्रक्रिया, शिजवणे वेगवेगळ्या पद्धतीत करावे, अन्यथा व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सूचक इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे.

शाकाहारी अन्नपदार्थाची मांसाहारी अन्न पदार्थापासून प्रक्रियात्मक व साठवणीच्या टप्प्यावर स्पष्टपणे वेगळी व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अन्न सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर परवाना रद्द, दंड आकारणे किंवा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे. सर्व अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षेबाबत असलेल्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. अन्न व औषध प्रशासनामार्फत गतवर्षी राज्यातील ३० हजार अन्न व्यवसायिकांना अन्न सुरक्षेबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. तर या वर्षी एक लाख अन्न व्यवसायिकांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अन्न सुरक्षा ही केवळ कायदेशीर बाब नसून ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. नियमांच्या पालनात दोषी अन्न आस्थापनाना त्वरित नोटीस, कारवाई व आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**१८९ अन्न सुरक्षा अधिकारी नियुक्त!**

अन्न व औषध प्रशासनात एकूण नवीन १८९ अन्न सुरक्षा अधिकारी ७ जून २०२५ रोजी रुजू झालेले असल्याने अन्न आस्थापना तपासणी संख्या निश्चितच वाढणार आहे. राज्यभरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व उपाहारगृहांमध्ये नियमित तपासण्या केल्या जात असून तपासणीत दोषी आढळणाऱ्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

# छगन भुजबळ यांचा इशारा आणि नाशिक महापालिका कामाला....

**महासागर प्रतिनिधी, नाशिक , दि. २० :** शहरातील उड्डाण पुलाखालील द्वारका आणि मुंबई नाका परिसरातील अतिक्रमण, वाहतूक कोंडी यावरून राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र संताप व्यक्त करताच रविवारी सुट्टीच्या दिवशी महापालिकेची अवघी यंत्रणा कामाला लागली. सकाळपासून या भागातील अतिक्रमणांवर धडक कारवाईला सुरूवात केली. रस्त्यालगत उभी वाहने वाहतूक पोलिसांनी उचलून नेत वाहतुकीतील अडथळे दूर केले. फेरीवाले आणि हातगाडीधारकांवर कारवाईचे सुतोवाच करण्यात आले. सतत वाहतूक कोंडी होणाऱ्या मुंबई नाका आणि द्वारका चौक परिसरास शनिवारी भुजबळ यांनी भेट देऊन पाहणी केली होती.





यावेळी त्यांनी या भागातील फेरीवाले, उड्डाण पुलाखाली अनधिकृत बस्तान मांडणारे विक्रेते, स्वच्छतेचा अभाव, अनधिकृतपणे थांबलेल्या रिक्षांवर कारवाईकडे दुर्लक्ष यावरून रोष प्रगट केला होता. या प्रश्नांवर आंदोलनाची भूमिका त्यांनी मांडली. प्रमुख अधिकाऱ्यांना हे विषय जिव्हाळ्याचे वाटत नसल्याचे त्यांनी सुनावले. या घटनाक्रमानंतर मनपा, जिल्हाधिकारी, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंत्री भुजबळ यांची भेट घेऊन चर्चा केल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर रविवारी सकाळपासून महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने द्वारका चौकातून मुंबई नाका आणि ओझरकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यास सुरुवात केली. दुकानाच्या पुढील शेड, अनधिकृत बांधकामे, टपऱ्या-हातगाड्यांवर कारवाई करण्यात आली.

दोन्ही बाजुच्या सेवा रस्त्यांवर पुढील आठ दिवस कायमस्वरुपी ही कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती मनपाच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी दिली.

उड्डाण पुलाखाली वास्तव्य करणाऱ्या विक्रेते व कुटुंबियांचे पंचवटीतील निवारागृहात स्थलांतर करण्यात येणार असल्याचे झगडे यांनी नमूद केले. कारवाईला सुरूवात झाल्यानंतर काहींनी स्वत:हून अतिक्रमण काढून घेण्याची तयारी दर्शविली.

# व्हिएतनामच्या राजधानीत ठाकरे बंधूंचा बॅनर

**महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. १५ :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे यासाठी व्हिएतनामची राजधानी हनोई येथे मराठी बांधवांनी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे यासाठी बॅनर झळकविले. 'महाराष्ट्रासाठी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे' असे या बॅनरवर म्हटले आहे. या बॅनरवर केवळ दोन नेत्यांची छायाचित्रे नव्हती, तर ती एक भावना होती. एकतेची, बंधुभावाची आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची असे बॅनर फडविणाऱ्यांनी सांगितले. व्हिएतनाममधील तसेच जगभरातील मराठी माणसांचे हे आवाहन आहे की महाराष्ट्रात दोन प्रभावशाली नेते उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र यावे असेही त्यांनी सांगितले. ज्या प्रकारे देशांतर्गत नागरिक या एकतेची अपेक्षा बाळगून आहेत,



त्याचप्रमाणे परदेशातील मराठी बांधवही भावनिकरित्या आपल्या मातृभूमीशी जोडले गेले आहेत. आजच्या काळात महाराष्ट्राला स्पष्ट दिशा, विकासाभिमुख नेतृत्व आणि मराठी अस्मितेचा बुलंद आवाज आवश्यक आहे.

जो केवळ ठाकरे बंधूंनी मिळूनच शक्य आहे. मतभेद असू शकतात, पण मनभेद नसावेत. राजकारणात भिन्नता असली तरी महाराष्ट्रासाठी एकवाक्यता हवी असेही त्यांनी सांगितले.

# खासगी सोसायट्यांमधील धोकादायक झाडे, फांद्या महापालिका तोडणार
# दोन महिन्यांत ७४८ ठिकाणच्या फांद्या कापल्याचा महापालिकेचा दावा

**महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १५ :** शहरातील धोकादायक झालेल्या झाडांच्या फांद्या पडून दुर्घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर महापालिका प्रशासन जागे झाले आहे. नागरिकांनी झाडे, फांद्या तोडण्यासाठी दिलेले ३०९ अर्ज मंजूर करण्यात आले असून, आता शहरातील खासगी सोसायटीच्या आवारातील धोकादायक झाड आणि फांद्या आढळल्यास महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कापण्यात येणार आहेत. मात्र, त्या कामाचा खर्च संबंधित सोसायटीकडून वसूल केला जाणार आहे. दरम्यान, गेल्या दोन महिन्यांत उद्यान विभागाने शहरातील विविध भागांत ७४८ ठिकाणी कामे करण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला आहे. पावसाला सुरुवात होण्यापूर्वी धोकादायक झाडे, फांद्या काढून टाकण्याचे आदेश महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्तांनी



दिले. त्यासाठी विविध विभागांसह उद्यान विभागातील कर्मचारी, अधिकारी यांच्या बैठका देखील घेण्यात आल्या. मात्र त्यानंतरही धोकादायक फांद्या तोडण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले. पावसामुळे नीलायम चित्रपटगृह आणि एरंडवणा परिसरात धोकादायक झालेल्या झाडांच्या फांद्या पडल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर महापालिकेकडे आलेल्या तक्रारीची आणि प्रस्तावांची दखल घेत उद्यान विभागाने सर्व अर्ज निकाली काढले आहेत.

पूर्वी धोकादायक झाडे, फांद्या कापण्याची किंवा छाटण्याची परवानगी उद्यान विभागाच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडून दिली जात होती. त्यामुळे अनेक कामे रखडत होती. महत्त्वाच्या प्रकल्पांनाही याचा फटका बसत होता. त्यामुळे आता धोकादायक झाडे, फांद्या तोडण्याचा परवाना देण्याच्या कामाचे विक्रेंद्रीकरण करण्यात आले आहे. हे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावरील समितीला देण्यात आले आहेत. मात्र, विकेंद्रीकरण करूनही अनेक प्रस्ताव रखडत असल्याच्या तक्रारी अतिरिक्त आयुक्त कार्यालयांकडे आल्या होत्या. दोन जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्यानंतर उद्यान विभागाच्या कारभारावर टीका झाली. त्यानंतर उद्यान विभागाने प्रलंबित असलेल्या सर्व ३०९ प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. तसेच महापालिकेच्या वृक्ष छाटणी गाडीने शहरातील ४३९ ठिकाणी धोकादायक फांद्या व झाडांची छाटणी पूर्ण केली आहे. गेल्या दोन महिन्यांत शहरातील ७४८ ठिकाणी ही कामे केल्याचा दावा उद्यान विभागाने केला आहे.

# ठाणे-बोरीवलीभुयारी मार्गाची समस्या
## सुटल्यानंतर खासदार नरेश म्हस्के यांची प्रतिक्रिया

**महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. १५ :** बोरिवली मार्गावरील बोगदा मुल्लाबाग ऐवजी सत्यशंकर परिसराच्या भिंतीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्रेय रहिवाशांचे असून हा लढा रहिवाशांनी जिंकला असे म्हस्के म्हणाले.



**श्रेय रहिवाशांचे असून हा लढा रहिवाशांनी जिंकला असे म्हस्के म्हणाले.**

ठाणे- बोरिवली बोगदा प्रकल्पाचे काम सध्या मानपाडा येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याशी सुरु आहे. या कामामुळे पाच इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना वाहतूक कोंडी, धूळ आणि ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत होता. रहिवाशांनी येथील कामाला विरोध आंदोलन केले होते.

काही दिवसांपूर्वीच खासदार नरेश म्हस्के, रहिवासी आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अधिकाऱ्यांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नावर सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक घेतली होती. बैठकीत मुल्लाबाग रहिवासी संघाच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांची अडचण समजून घेण्यात आली. त्यानंतर त्यांच्या मागणीनुसार हा बोगदा मुल्लाबाग ऐवजी सत्यशंकर परिसराच्या भिंतीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या मार्गावर सध्या वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणाचा त्रास कमी करण्यासाठी राडारोडा आच्छादित करून त्यानंतर तो वाहून नेण्याचा निर्णय घेण्यात आला

# पेन्शन अदालतेत गोंधळाची पुनरावृत्ती

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १५ : नागपूर जिल्हा परिषदेच्या स्व. आबासाहेब खेडकर सभागृहात दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी आयोजित केली जाणारी 'पेन्शन अदालत' मंगळवार १० जुन रोजी पुन्हा एकदा गोंधळाचे कारण ठरली. जिल्ह्यातील शेकडो सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विविध तक्रारी घेऊन उपस्थित होते. मात्र, समस्यांचे समाधान करणारे शिक्षण, वित्त व सामान्य प्रशासन विभागाचे जबाबदार अधिकारी गैरहजर असल्याने उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मागील

## सेवानिवृत्तांची निराशा

अदालतमधील समस्यांवर केवळ साचेबंद उत्तरे देऊन बोळवण करण्यात आल्याचा आरोप करत, आज मांडण्यात आलेल्या विविध समस्यांनाङ्कजसे की थकीत पेन्शन, प्रलंबित पीपीओ, निवड श्रेणी मंजुरी, सुधारित पेन्शन, आदर्श शिक्षक पुरस्कार वेतनवाढ, आणि भविष्य निर्वाह निधी मंजुरीङ्कउपस्थित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. गट विमा योजनेतील थकीत वर्गणीबाबतही प्रशासनाची गोंधळलेली भूमिका स्पष्ट दिसून आली. अनेक शिक्षकांनी दस्तऐवजासह पुरावे सादर करत प्रशासनाची चूक अधोरेखित केली. पंचायत समिती प्रशासनाच्या चुकीमुळे अनेक शिक्षकांना मागील दहा वर्षांचे आयकर विभागाकडून डिमांड नोटीसा येत असल्याबाबतही तक्रारी नोंदविण्यात आल्या. यावरही कोणतेही ठोस उत्तर प्रशासनाकडून देण्यात आले नाही.

या वेळी शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी उपशिक्षणाधिकारी विजय

### जबाबदार अधिकारी गैरहजर, समस्यांचे समाधान शून्य; पेन्शन अदालत म्हणजे केवळ देखावा असल्याचा आरोप

कोकोडे, सामान्य प्रशासन विभागाचे भजभुजे आणि वित्त विभागाचे मोटघरे व्यासपीठावर उपस्थित होते. मात्र, वरिष्ठ स्तरावरील अनुपस्थितीमुळे पेन्शन अदालत म्हणजे 'निव्वळ फार्स' असल्याचा संतप्त आरोप सेवानिवृत्तांनी केला.

# रामटेक येथे मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवस साजरा



रामटेक : महाराष्ट्र नवनिर्माण सेना संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रामटेक विधानसभेत सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.मनसे जिल्हाध्यक्ष शेखर भाऊ दुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रामटेक येथील वृद्धाश्रम आणि उपजिल्हा रुग्णालय येथे अन्नदान व फळ वाटप करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे मनसे प्रमुख राज ठाकरे यांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.हा उपक्रम समाजाप्रती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची बांधिलकी दर्शवणारा होता.



# आयुर्वेदीय औषधनिर्मितीचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना मिळाला अनुभव

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १५ :
वानाडोंगरी येथील दत्ता मेघे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे औषधी वनस्पतींच्या सहाय्याने आयुर्वेदीय औषधनिर्मितीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या विशेष उपक्रमात डॉ. संतोष सुर्यकांत पुसदकर आणि डॉ. पूनम मदान यांच्या उपस्थितीत औषध तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांसमोर थेट प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

कार्यक्रमात औषधी वनस्पतींची शास्त्रशुद्ध ओळख, संकलन, प्रक्रिया व औषधनिर्मितीचे विविध टप्पे सविस्तर समजावून सांगण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः प्रत्यक्ष औषध तयार करण्याचा अनुभव घेतला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये औषधनिर्मितीबाबतचे व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत झाले असून पारंपरिक आयुर्वेद शास्त्राला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याची गरज डॉ. पुसदकर आणि डॉ. मदान यांनी अधोरेखित केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर भविष्यातील व्यावसायिक दृष्टीनेही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरला.

# सत्यशोधक रघुनाथ ढोक यांचा महात्मा फुले विचार रत्न पुरस्काराने गौरव



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :
संत कबीर जयंती निमीत्ताने श्री गुरुदेव सेवामंडळ, नागपूर च्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या पुणे येथील सत्यशोधक रघुनाथ दादा ढोक यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

महात्मा फुलेंच्या वेषात रघुनाथ ढोक सत्यशोधक पद्धतीने लग्न लावतात. आजवर ढोक यांनी ५३ जातीय, आंतरजातीय विवाह लावले आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आचार्य हरिभाऊ वेरुळकर होते. रघुनाथ ढोक यांचा सत्कार म्हणजे मानवतावादी विचारांचा सत्कार असे मत मांडले. सत्कारमुर्ती रघुनाथ ढोक यांनी माझा सत्कार नसुन फुलेंच्या विचारांचा गौरव आहे. सत्कारामुळे फुलेंच्या विचाराप्रती माझी जबाबदारी वाढली असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक यावले यांनी संत कबीरांचा फुलेंच्या विचारांमुळे सामाजिक बंधन आणखी घट्ट होतात असा विचार दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेंद्र बुराडे यांनी तर संचालन राजेश कुंभलकर यांनी केले. कार्यक्रमाला ज्ञानेश्वर रक्षक, महात्मा फुलेंचे वारस डॉ. दिलीप नेवासे, सातारा, माजी न्यायाधीश शिवदास महाजन, पुणे, माजी नगराध्यक्ष मायाताई चवरे उपस्थित होत्या. दिलीप सुरकार यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव विठ्ठलराव पुनसे, संगीता जावळे, प्रभा ठवकर, प्रा. रामदास टेकाडे, रुपराव वाघ, मुरलीधर नरड, सियाराम चावके, आंनद माथने बहुसंख्य पुरोगामी विचारवंत उपस्थित होते.

# पिपळा येथे मोफत बहुवैद्यकीय रोगनिदान शिबिर

## हृदय, मधुमेह, रक्तदाब, नेत्र आणि दंत तपासणीसाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १५ :
जनहिताय सेवार्थङ्क या प्रेरणेतून देशगौरव प्रतिष्ठान आणि रिषभ मल्टी स्पेशालिटी क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १५ जून रोजी पिपळा येथील सह्याद्री कॉन्व्हेंट येथे आरोग्यमब धनसम्पदा उपक्रमाअंतर्गत मोफत बहुवैद्यकीय रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब, नेत्ररोग व दंतरोग अशा विविध आजारांचे तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व डॉ. धर्मेंद्र कोसे, डॉ. मनीष आष्टणकर, डॉ. कौस्तुभ उपाध्ये व डॉ. प्रियांका आष्टणकर यांनी केले. शिबिराचे उद्घाटन देशगौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष व पिपळा-घोगली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नरेश भोयर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी स्वप्निल शेळके, स्नेहा मते, भूमिका बेदरकर, अश्विनी गेडाम, मंगला कांबळे, मोनिका, राहुल व अक्षय बोरडकर यांनी सक्रिय भूमिका पार पाडली. याशिवाय ह.भ.प. चारुदत्त मोडक, अमोल धनुष्कर, अंकुश धाडसे, प्राचार्या रंजना भोयर, विठ्ठल नानवटकर, नितीन निखाडे, विनोद कनोजिया, महेंद्र मारशिंगे, चक्रधर भोयर, निलेश चीचुरकर व लक्ष्मण भोयर यांनीही संयोजन व व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी ठरलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# छत्रपती उड्डाणपुलावर 'बर्निंग कार' सुदैवाने चालकाचे वाचल प्राण



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : वर्धा मार्गाने घरी जात असताना अचानक कारमधून धूर निघायला लागला. चालकाने कार थांबविली आणि कारमधून बाहेर पडताच कारचा भडका उडाला. ही घटना शनिवारी रात्री छत्रपती उड्डाणपुलावर घडली. माहिती मिळताच प्रतापनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन यंत्रणाही पोहोचली. पाण्याचा मारा करीत आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. मात्र, कार पूर्णत जळाली. हर्षक महाजन (३५) रा. बुटीबोरी असे कार चालकाचे नाव आहे. हर्षक मुळचे अकोल्याचे असून नागपुरात जॉब करतात. शनिवारी रात्री कार्यालयातील काम आटोपूने ते एमएच-३०-एए-४४[illegible] क्रमांकाच्या कारने घराकडे निघाले होते. छत्रपती उड्डाणपुलापर्यंत गेले असता कारच्या मागच्या भागातून धूर निघायला लागला. मागच्या वाहन चालकाने लगेच ही माहिती हर्षकला दिली. हर्षकने लगेच कार थाबविली आणि बाहेर पडले. क्षणभरात कारने भडका घेतला. रस्त्याने जाणाऱ्या वाहन चालकाने सांगितले नसते तर...अनर्थ घडला असता. माहिती मिळताच प्रतापनगर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. दरम्यान या घटनेची माहिती अग्निशमन यंत्रणेला देण्यात आली. पाण्याचे बंबासह अग्निशमन जवानांनी पाण्याचा मारा करीत आगीवर नियंत्रण मिळिवले. याप्रकरणी प्रतापनगर पोलिसांनी नोंद केली आहे.

# राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १५ :
आपला शहर स्वच्छ व सुंदर व्हावं हे प्रत्येक शहरवासी यांचे एक स्वप्न आहे. आपला लोकप्रतिनिधी म्हणून हे स्वप्न पूर्ण करणं माझं आद्यकर्तव्य आहे. आणि त्या अनुषंगाने माझे अविरतकार्य चालले, त्याचाच एक भाग म्हणून आज रामटेक शहरातील विविध ठिकाणी विकास कामाची सुरुवात करून त्याचा दिनांक १५ जून २०२५ रोजी भूमिपूजन व लोकार्पण सोहळा राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते पार पडला. लवकरच हे विकास कामे पूर्ण होऊन याचा फायदा शहरवासी यांना होणार आहे. असे प्रतिपादन ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले.

रामटेक येथिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सौंदर्यीकरण, स्व. सदाशिवराव किंमतकर न.प.प्राथमिक शाळा नूतनीकरण लोकार्पण, कै.विठ्ठलराव हटवार न.प.प्राथमिक शाळा नूतनीकरण लोकार्पण, स्व. जतीराम बर्वे न.प.प्राथमिक शाळा नूतनीकरण, स्व. रामजी महाजन न.प.प्राथमिक शाळा नूतनीकरण, रामाळेश्वर मंदिर येथे विद्युत व्यवस्था, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे विद्युत व्यवस्था, अठराभुजा गणेश मंदिर येथे विद्युत व्यवस्था, डूमरेश्वर मंदिर येथे विद्युत व्यवस्था, तीळभांडेश्वर मंदिर येथे विद्युत व्यवस्था, माँ कुमारिका बाहुली मंदिर येथे विद्युत व्यवस्था, पापदुपेश्वर मंदिर येथे विद्युत व्यवस्था, टिळक वॉर्ड येथिल मोहन मंगल सांगोडे शाळा येथे फुटसल ग्राउंडचे लोकार्पण, किरण पॉईंट येथे विश्रामगृह बांधकाम, हांडे पेंटर ते गहू तलाव रोड पर्यंत बीटी रोडचे काम,संत गोरोबा काका चौक येथे सौंदर्यीकरण, जैन मंदिर चौक सौंदर्यीकरण, नेहरू चौक सौंदर्यीकरण, कालंका मंदिर परिसरातिल उद्यान विकसित करणे, दिलीप भोयर यांच्या घरापासून ते कालंका मंदिर रोड बांधकाम, मोरेश्वर जनबंधू ते सिंधू डोंगरे यांच्या घरापर्यंत रोडचे बांधकाम, करण किराणा ते जियालाल चंदनबटवे यांच्या घरापर्यंत नालीचे व रोड, राजु हटवार ते वसंता अहिरकर यांच्या घरापर्यंत रोड, आंबेडकर वॉर्ड येथील पाण्याच्या टाकीपासून ते गहू तलाव रोड पर्यंत पथदिवे उभारणे, कैलाश इंदोरकर ते गोविंद वानखेडे यांच्या घरापर्यंत नाली व रोड, सिकंदर कोलते ते दुर्गा नागर यांच्या घरापर्यंत रोड, विनोद राऊत ते सतीबाई अंबादे यांच्या घरापर्यंत रोड, पंजाब अंबादे ते विशाल अंबादे यांच्या घरापर्यंत रोड, उषा रहाटे ते पारधी यांच्या घरापर्यंत रोड, नरेश माणिक दुर्गे यांच्या घराजवळ रोडचे काम, संजय गेडाम ते अविनाश नागपुरे यांच्या घरापर्यंत रोड, हर्षल कोटांगले ते दयाराम सुखदेवे यांच्या घरापर्यंत रोड, रमाबाई आंबेडकर सभागृह ते बालू ढोके यांच्या घरापर्यंत ड्रेनचे बांधकाम करणे, माधवराव दिवटेलवार ते प्रवीण कडू यांच्या घरापर्यंत पेव्हेर्स बसविणे या कामांचा समावेश आहे. असे एकुण १६ कोटी १४ लाख रुपयांचे भूमिपूजन राज्यमंत्री तथा रामटेक विधानसभा क्षेत्राचे आमदार ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. तर लवकरच ह्या कामाची सुरुवात करून हे बांधकाम व अन्य कामे पूर्ण होणार आहे. या विकासकामाच्या भूमिपूजन सोहळ्या प्रसंगी शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक,शिवसेना शहर प्रमुख राजेश किंमतकर, शिवसेना शहर संघटक बिकेंद्र महाजन,युवासेना उपजिल्हाप्रमुख कमलेश शरणागत, भाजपचे संजय मुलमुले,नगरपरिषद माजी नगराध्यक्ष नलिनी चौधरी, विश्वास पाटील,माजी उपाध्यक्ष आलोक मानकर, भाजपा चे राहुल किरपान, भाजप रामटेक शहर अध्यक्ष उमेश पटले,माजी नगरसेवक सुमित कोठारी, रजत गजभिये, हिमांशु पानतावणे, विलास तांदूळकर, ज्योती पडोळे, नरेश माकडे, राधेश्याम साखरे, प्रणय सोमनाथे,राहुल शर्मा, माजी नगरसेवक विनायक सावरकर, माजी नगरसेवक सुरेखा माकडे, लता कांबळे यांच्यासह रामटेक शहर महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# १३ जुलै रोजी विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीची प्रतिष्ठापना

## पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर यात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १५ : स्व. श्री कृष्णराव चरडे (गुरुजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री कृष्ण फाऊंडेशनच्या वतीने वाडी येथून पंढरपूर, अक्कलकोट व तुळजापूर या तीन प्रमुख तीर्थक्षेत्रांची भव्य यात्रा आयोजित करण्यात आली. माऊली नगर व आदर्श नगर येथील नागरिकांसाठी खास खाजगी बसद्वारे १३ जून रोजी ही यात्रा प्रारंभ झाली, ज्यात २७ भाविक भक्तिभावाने सहभागी झाले.

या यात्रेमध्ये भाविकांना पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ मंदिर व तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मंदिराचे दर्शन घेण्याची संधी मिळत आहे.

यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे, पंढरपूर येथून आणण्यात येत असलेली ३ फूट उंचीची श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती, जी माऊली नगरातील दुर्गा मंदिरात प्रतिष्ठापित केली जाणार आहे. १३ जुलै, रविवार रोजी मोठ्या भक्तिभावाने या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार असून, यानंतर मंदिरात नियमित पूजा-अर्चा,भजन व कीर्तनांचे आयोजन सुरू राहणार आहे. या उपक्रमामुळे माऊली व आदर्श नगर परिसरात आध्यात्मिक वातावरणाची निर्मिती झाली आहे. महिलावर्ग, भजन मंडळे आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग लक्षणीय आहे.

यात्रेचे संयोजन सोनू चरडे, राजेश गिरी, विकी पाठक, राहूल ठाकरे यांनी केले असून, मदन गोहते, दामू जोध, शिवनारायण पवार, गणेश इंगले, उत्तम बोबडे, पांडुरंग मोहितकर, घोंगे साहेब, नाथे साहेब, तुरणकर सर, अनील कोरडे, अरुण अंबरते, महेश कोरे, राजू राजपूत आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. महिलांमध्ये सीताताई सरोदे, आशाताई चरडे, रेखाताई कळमकर, शोभा लडी, आशाताई लडी, सुनीताताई तुरणकर, चंदाताई मुने, शालिनी साठवणे, आशा नाठे, मंदाताई बोबडे, वनिताताई ठाकरे, अर्चनाताई इंगले, सोनाबाई नंदेश्वर व शर्मा दीदी यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. ही यात्रा केवळ तीर्थदर्शनापुरती मर्यादित न राहता, धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि आध्यात्मिक उन्नती साधणारी ठरणार आहे.

श्री कृष्ण फाऊंडेशन ही संस्था धार्मिक, सामाजिक आणि सेवाभावी कार्यात सदैव अग्रेसर आहे. या संस्थेने वाडी परिसरातील नागरिकांसाठी शववाहिनी व वातानुकूलित शवपेटीची सुविधाही पुरवलेली आहे.

# 'विदर्भ गौरव पुरस्कार २०२५' द्वारे डॉ. प्रीतम भी. गेडाम यांचा सन्मान



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : आजच्या आधुनिक युगात जिथे परोपकाराची भावना झपाट्याने लोप पावत आहे, तिथे सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची काळजी करीत समाजासाठी निस्वार्थपणे जगणारे, समाजाला योग्य दिशेने नेण्याचा प्रयत्न करणारे लोक कमी असलेत, तरीही ते अजून शिल्लक आहेत. त्यापैकीच नागपूर शहरातील उच्चशिक्षित सुप्रसिद्ध लेखक, सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक डॉ. प्रीतम भीमराव गेडाम, जे अनेक वर्षांपासून गंभीर सामाजिक प्रश्न, विकास आणि जनजागृतीसाठी लेखक, स्तंभकार, समाजसेवक, मार्गदर्शक, साहित्यिक, प्राध्यापक, अतिथी व्याख्याता, सल्लागार, पर्यावरणवादी, विश्लेषक अशा अनेक भूमिका सेवेच्या रूपाने पार पाडत आहेत. सामाजिक समस्यांवरील यांचे हजारो लेख जागृती आणि लोककल्याणासाठी जगभरातून प्रकाशित झाले आहेत, ज्यासाठी यांचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्येही नोंदवले आहे. समाजातील प्रत्येक घटक जागरुक व्हावे या उद्देशाने वनीकरण, व्यसनमुक्ती, स्वच्छता मोहीम, करिअर मार्गदर्शन, रोजगाराभिमुख, शैक्षणिक समुपदेशन, व्याख्याने करीत असतात. केंद्र आणि राज्य सरकारद्वारे पुरस्कृत अनेक संस्थांसह सामाजिक उपक्रमांवर विविध कार्यक्रम राबवितात. यांचा अशाच समाजसेवेने भारावून ङ्कवीर शिव छत्रपती संघटना, एस.आर.एन. फिल्म प्रोडक्शन आणि न्यूज इंडिया २४ङ्क यांनी संयुक्तपणे उत्कृष्ट लेखन आणि सामाजिक कार्यासाठी यावर्षीचा प्रतिष्ठित सन्मान ङ्कविदर्भ गौरव पुरस्कार २०२५ङ्क प्रदान करून गौरविण्यात आले. यांचा या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. याआधीही यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या सत्कार समारंभात मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना, कलाकारांना, साहित्यिकांना आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गजांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल विदर्भ गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आले. समाजाच्या उन्नतीसाठी आणि कलागौरवासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या विशेष व्यक्तीला 'विदर्भ गौरव पुरस्कार' हा प्रतिष्ठित पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला जातो. हा प्रतिष्ठित पुरस्कार सन्मान सोहळा नागपूरच्या कविवर्य सुरेश भट्ट सभागृहात प्रमुख पाहुणे मंडळी, मान्यवर, अधिकारी, कलाकार व कलाप्रेमींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले. या सत्कार समारंभात प्रमुख पाहुण्यांमध्ये श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले, आमदार मोहनजी मते, आमदार प्रवीणजी दटके, नेते किशोर कुमेरिया, नेते गिरीश पांडव, पुलिस उपाधीक्षक अशोक बघुल, पुलिस उपनिरीक्षक अजय शेवाळे, चित्रपट दिग्दर्शक संजय भुजाडे, चित्रपट दिग्दर्शक विजय गुमगावकर, चित्रपट दिग्दर्शक पराग भावसार, अभिनेता राम चौघुले, निर्माता व लेखक दिपक पाटील, निर्माती व दिग्दर्शिका रंजना शिंगाडे, नृत्य निर्देशक समीर कुमार उपस्थित होते.

आयोजकांतर्फे न्युज इंडिया २४ एडिटर शीतल नंदनवार, प्रोडक्शन मॅनेजर एस. आर. एन. फिल्म प्रोडक्शन दिक्षा देशमुख, सिनेअभिनेता व दिग्दर्शक सागर निकम उपस्थित होते. मॉडेल व ऍक्टर सुरज कडू, सिने अभिनेत्री रोशनी सेलोकर, रीलस्टार आशिष संतापे, लावणी क्विन डॉ. विद्याश्री येमचे, सिने अभिनेत्री डॉ. इशिका सूर्यवंशी, सिने गायक भूषण जाधव, सिने अभिनेता योगेश पवार, सिने अभिनेत्री व नृत्य दिग्दर्शिका प्रिया मोंढे उपस्थित होते. विख्यात सिने अभिनेते देवेंद्र दोडके, राजेश चिटणीस, समीर दंडारे, मधुरजी भंडारकर पाहुणे म्हणून लाभले. सोबतच राज्यभरातून विविध कलाक्षेत्रातील, मराठी चित्रपट आणि टेलिव्हिजन सृष्टीतील कलावंतांनी ह्या सन्मान सोहळ्याला मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# महिलेसह ५ गुन्हेगार तडीपार

**नागपूरः** परिमंडळ क्र. ५ चे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी कळमना, जुनी कामठी, जरीपटका, यशोधरानगर आणि नवीन कामठी ठाण्यांतर्गत सक्रीय ५ गुन्हेगारांना तडीपार केले. त्यांच्यामध्ये एका महिलेचाही समावेश आहे. प्रमिला उर्फ उर्मिला रामकिशन उपवंशी (३६) रा. मानसी हाऊसिंग सोसायटी, वांजरा रोड, लोकनाथ उर्फ बबलू मुन्नास्वामी पिल्ले (२८) रा. कोळसा टाळ, कामठी, अनूज विनय दुपारे (२१) रा. लुंबिनीनगर, राजू शंकर धकाते (४०) रा. नवी मंगळवारी, बिनाकी आणि मनीष बुद्धाजी गजभिये (३८) रा. आंबेडकरनगर, कामठी अशी तडीपार केलेल्या गुंडांची नावे आहेत. सर्व आरोपींविरुद्ध अवैध दारू विक्री, मारहाण, लोकांना धमकावणे, चोरी, अतिक्रमण, आर्म्स ॲक्ट आणि विनयभंगासारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत. यापूर्वीही पोलिसांनी त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई केली होती, मात्र त्यांच्या वागणुकीत कुठलाही बदल झाला नाही. सर्व सतत गुन्हेगारीत सक्रीय होते. परिसरातील नागरिकांमध्ये त्यांची भीती निर्माण होत होती. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक पोलिस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांनी तडीपारीचा प्रस्ताव तयार केला. पोलिस उपायुक्त कदम यांनी प्रमिला, राजू आणि मनीषला ६ महिन्यांसाठी तर, बबलू आणि अनूज यांना एक वर्षासाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले.

# वीज जाते आणि येते... मध्ये काय घडते ?

*** योगेश विटनकर ***
**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर**

पावसाळा आणि वीजपुरवठा यांचे नाते सर्वांनीच गृहित धरलेले असते. अर्थात, विजेशिवाय जगण्याची कल्पनाच करणे शक्य नाही, इतके तिचे महत्त्व वाढलेले आहे. त्यामुळे वीज गेली की, आपल्या संतापाचा पारा चढतो. परंतु वीज जाते, हे वास्तव आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. दुसऱ्या दिवशी त्याची बातमीही होते. परंतु, वीज का गेली, का जाते, याचे उत्तर बहुतेकांना माहीत नसते.

यंत्रणा जोखमीची रात्री-अपरात्री वीज गेल्यानंतर काही वेळातच ती परत येते. विजेची यंत्रणा अशी आहे की, ती चालू अथवा बंद करण्यासाठी व्यक्तीची गरज लागते. शिवाय या यंत्रणेत जिवाचा धोका असतो. मोबाईल किंवा टेलिफोनचे तसे नाही. त्याचे एकदा कनेक्शन घेतले की, त्याची सेवा संबंधित कंपनीला एका ठिकाणी बसून चालू विंधा बंद करता येते. तीही कोणत्या जोखमीशिवाय, वीज यंत्रणा त्याला अपवाद आहे. रात्री-अपरात्री गेलेली वीज काही वेळात परत येते, तेव्हा कोणीतरी त्या पावसात अंधारात स्वतःचा जीव धोक्यात घालून खांबावर चढलेला असतो. तेव्हा कुठे वीज येते. त्यामुळे वीज यंत्रणेवर दोषारोप करण्यापेक्षा त्याच्यातील गुंतागुंत समजून घेतली पाहिजे. सारा पसारा उघड्यावर पारंपरिक अथवा अपारंपरिक स्रोतांपासून देशाच्या कानाकोपऱ्यातून निर्माण झालेली चीज ग्राहकांच्या दारात आणणे तेवढे सोपे नाही. त्यासाठी लाखो किलोमीटर वीजवाहिन्यांचे जाळे देशात सर्वदूर पसरलेले आहे. त्याला 'ग्रीड' म्हणतात. हा सारा पसारा उघड्यावर आहे. नैसर्गिक विंचा मानवनिर्मित आपत्तींचा या यंत्रणेवर परिणाम होऊन त्यात बिघाड होण्याची शक्यता असते. चक्रीवादळ, पूर, रस्ते अपघात यामुळे यंत्रणा कधी कधी ठप्प होते. एखादी उच्चदाब वाहिनी कोसळली तर कधी एखादा जिल्हा विधा काही तालुके अंधारात जातात, तर कधी हा बिघाड गाव विधा काही भागापुरता मर्यादित असतो. पावसाळ्याच्या सुरुवातीला वादळवारे व आकाशाच्या विजेतील कडकडाट सर्वांनी अनुभवलेला आहे.

तारेच्या जाळ्यांमधून घरात आलेली वीज असो की आकाशात लखलखणारी वीज, दोन्हींमध्ये प्रचंड ऊर्जा असते. आकाशात विजेचा कडकडाट सुरू झाला की, घरातील वडीलधारी माणसे वीज उपकरणे बंद करतात. कारण, उच्च दाबामुळे ती जळण्याची शक्यता असते. दोन विद्युत चुंबकीय क्षेत्र एकत्र आल्याने दाब वाढतो व यंत्रणा बंद पडते. नव्हे, तशी सोयच यंत्रणा वाचविण्यासाठी केलेली असते.

हानी टाळण्यासाठी यंत्रणा : दुसरी बाब म्हणजे वीज खांबात विद्युतप्रवाह उतरू नये यासाठी चॉकलेटी रंगाचे चिनी मातीचे इन्सुलेटर खांबावर बसविले जातात. बहुधा ते उन्हामुळे विचा विद्युतप्रवाहामुळे गरम होतात व त्यावर पावसाचे थेंब पडताच त्याला तडे जातात,

ज्यामुळे वीजप्रवाह खांबातून जमिनीत उतरतो आणि लगेचच आपात्कालिन यंत्रणा कार्यान्वित होऊन फीडर (वीजवाहिनी) बंद पडतो. जर हा फीडर बंद पडला नाही तर जीवित वा वित्तहानी होण्याचा धोका असतो.

बिघाड शोधणे जिकिरीचे जेव्हा वीजपुरवठा अचानक खंडित होतो, तेव्हा बीज उपकेंद्रातील कर्मचारी जवळच्या उपकेंद्राशी संपर्क साधून त्यांच्याकडे वीजपुरवठा आहे की नाही, याची खात्री करत असतात. वीजपुरवठा असल्याची खातरजमा झाल्यानंतर फीडर चालू केला जातो. जर फीडर पुन्हा ट्रीप झाला (बंद पडला) तर मात्र बिघाड झाल्याचे घोषित करण्यात येते. तथापि, बिघाड शोधणे जिकिरीचे असते. ऊन-वाऱ्याची, पावसाची अथवा अंधाराची तमा न करता ही शोध मोहीम हाती घेतली जाते. कधी बंद पडलेल्या वाहिनीवरील सर्व खांब तपासावे लागतात, तर कधी हा बिघाड काही खांबांदरम्यान सापडतो.

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग लष्करातील जवानाला युद्धाचा सराव दररोज करावा लागतो. परंतु, युद्ध करण्याची वेळ सहसा येत नाही. इथे मात्र वीज कर्मचारी रोज युद्धभूमीवर असतात. चूक झाली की जीव जाणार, याची खूणगाठ बांधूनच त्यांना खांबावर चढावे लागते. सर्व प्रकारची काळजी घेऊनही वीज कर्मचाऱ्यांना प्राणांतिक अपघात होण्याच्या घटना अधूनमधून घडत असतात. परंतु, मानवी संवेदना इतक्या क्षीण झाल्या आहेत की, एखाद्याच्या जिवाचे मोलही आपण ध्यानात घेत नाही. वीज जाते आणि येते, यादरम्यान काय होते, याचा विचार आपण जेव्हा करू त्यावेळी आपण महावितरण किंवा कोणत्याही वीज कर्मचाऱ्याला दोष देणार नाही.

**वीज गेल्यास काय करावे आणि काय करू नये ?**

१. आपल्या घरात आरसीसीबी (रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर) असणे गरजेचे आहे, जेणेकरून घरातील वीज यंत्रणेत बिघाड झाला तर वीजपुरवठा बंद होऊन जीवितहानी टाळता येईल.
२. अर्थिंग सुस्थितीत असली पाहिजे. गरजेनुसार त्याची तपासणी करावी. ३. वीज उपकरणे विधा वायरिंग ओलाव्यापासून किंवा पत्र्यापासून सुरक्षित असावी.
४. वीज उपकरणे हाताळताना पायात स्लिपर घालावी व वीजपुरवठा बंद झाल्याची खात्री करावी. ५. विद्युत खांबाला व ताणाला जनावरे बांधू नयेत. ६. वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे थांबूनच वीज वैपनीला संपर्क करावा.
७. बिघाड नेमका कोठे झाला याची माहिती असल्यास वीज वैमनीला संपर्क करावा.
८. विजेच्या तारा तुटल्यास त्याला हात लावू नये. तातडीने महावितरणला माहिती द्यावी.

खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी विविध पर्याय वीजपुरवठा खंडित झाल्यास १५ ते २० मिनिटे वाट पाहूनच महावितरणला माहिती द्यावी. त्यासाठी महावितरणच्या १९१२, १८००-१०२-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर द्यावी. तसेच आपल्या रजिस्टर्ड मोबाईल क्रमांकावरून ०२२-४१०७८५०० या क्रमांकावर मिसकॉल द्यावा अथवा NOPOWER ग्राहक क्रमांक हा एसएमएस ९९३०३९९३०३ या क्रमांकावर पाठवावा. महावितरणच्या मोबाईल अँप आणि संकेतस्थळावरूनही ग्राहक वीजपुरवठ्याबाबरची तक्रार नोंदवू शकतात.



पावसाळ्याच्या सुरुवातीला वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार जास्त होतात. वीजपुरवठा खंडित झाला की, आपण वीज वितरण कंपनीला दोष देऊन मोकळे होतो. वीज का गेली, का जाते, या प्रश्नाचे उत्तर आपल्याला माहीत नसते. तसेच वीज जाते आणि येते, या मधल्या काळात काय घडते, हे जाणून घेण्याची गरज आहे.

# 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी फुगवलेला 'फुगा' !

एप्रिल महिन्याचा पहिल्या आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसे नेते राज ठाकरे यांची, त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. बराच वेळ दोन्ही नेत्यांमध्ये नेहमीप्रमाणे 'बंददाराआड' चर्चा झाली. नंतर 'डीनर डिप्लोमसी'ही झाली. सदरची भेट राजकीय नव्हती, असे दोन्ही कडूनही त्यावेळी सांगितले गेले. पण, महानगरपालिका निवडणुका जवळ आल्याने ही भेट योग्य रणनीती ठरवण्यासाठीच होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. नंतर 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'शिवसेना-मनसे' युती होणार, अशा बातम्या देण्यास सुरुवात केली. याचा धुरळा खाली बसतो ना बसतो तोच, ३ दिवसांनंतर एका पॉडस्काटवर प्रसिद्ध अभिनेते, निर्माते महेश मांजरेकर यांनी मनसे नेते राज ठाकरे यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा काही भाग वृत्तवाहिन्यांवर दाखवण्यात आला. त्यात उध्दव ठाकरे आणि आपण एकत्र येणार का ? या प्रश्नाला उत्तर देताना, राज ठाकरे म्हणाले की, 'महाराष्ट्र खुप मोठा आहे. त्याच्या पुढे आमची भांडणे किरकोळ आहेत'. यात राज ठाकरे यांनी स्पष्टपणे युती करू किंवा तयार आहे, असे म्हटले नाही. काही तासांतच कामगार सेनेच्या एका कार्यक्रमात बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले की, 'मीही सर्व विसरायला तयार आहे. पण, राज यांनी गद्दारांशी आणि भाजपशी संबंध ठेवणार नाही. कोणालाही घरी बोलवणार नाही. कोणालाही पाठिंबा देणार नाही, अशी शिवरायांपुढे शपथ घ्यावी', असा 'अटी' आणि 'शर्थी'चा गतिरोधक उभा करुन मनसेबरोबर जाण्याचे संकेत दिले. खरेच मराठी माणसासाठी एकत्र यायचे असेल तर, मंत्रिपद नको, लाल दिव्याची गाडी नको, सत्ता नको. फक्त मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येत आहोत, अशी जाहीरपणे उध्दव ठाकरे शपथ घेतील का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. त्यानंतर अजित पवार आणि शरद पवार एका बैठकीसाठी एकत्र आले. पुन्हा वृत्तवाहिन्यांच्या हाती कोलीत मिळाले ; आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार, असा सूर आळवण्यास सुरुवात केली. तेव्हापासून ते आजपर्यंत झाडून सर्व वृत्तवाहिन्यांवर 'उबाठा-मनसे' आणि 'शरद पवार-अजित पवार' एकत्र येणार याच विषयाचे स्वंथ चालू आहे. वृत्तच नव्हे तर, निरर्थक चर्चांच्या फैरीही झडत आहेत. संजय राऊत यांनीही राज यांच्या भूमिकेचे समर्थन केले. परंतु, 'मनसे' आणि 'उबाठा' गटाच्या काही नेत्यांनी मात्र नाराजी व्यक्त केली. मात्र, अंधभक्त असलेले कार्यकर्ते मात्र सुखावले. काहींनी तर 'युती होणारच' या विश्वासाने राज आणि उद्धवचे एकत्र बॅनरही झळकावले. डोंबिवली आणि नाशकात एकमेकांच्या कार्यक्रमातही सामील झाले. गमतीची गोष्ट म्हणजे, राज ठाकरे हे बाली या देशात गेलेले होते. त्या पाठोपाठ उध्दव ठाकरेही सहकुटुंब सहपरिवार नित्यनियमाप्रमाणे लंडनमधील 'मातोश्री-३' कडे रवाना झाले. नेते, प्रवक्ते, कार्यकर्त्यांत मात्र 'वाक युध्द' रंगले.

राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो. तसेच, राजकारणात केव्हाही काहीही घडू शकते, हे जरी खरे असले तरी 'उध्दव आणि राज' एकत्र येणे हे कदापिही शक्य नाही. दोघांमधून विस्तवही जात नाही, त्यामुळे ३६ चा आकडा ६३ होणे अशक्यप्राय गोष्ट आहे. थोडक्यात, हा प्रकार म्हणजे वृत्तवाहिन्यांनी पुन्हा एकदा 'शिळ्या कढीला ऊत' आणण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. यापूर्वीही २०१७ आणि २०१९ मध्ये असे प्रयोग झाले होते. आपल्या मराठी समाजाला 'भाऊबंदकी' ही सर्वात मोठी लागलेली 'कीड' आहे. पूर्वांपार ती चालत आलेली आहे. प्रसंगी एकमेकांचे मुडदेही पडल्याचे अनेक उदाहरणे आहेत. राज हे स्वाभिमानी आहेत. त्यांचा वकृत्वावर पगडा आहे. त्यांच्यात कमालीचा दूरदृष्टीपणा आहे. त्यांचं प्रत्येक भाषण, मुलाखत, प्रतिक्रिया ही मुद्देसूद आणि अभ्यासू असते. म्हणूनच त्यांची भाषणे ऐकण्यासाठी गर्दी तर होतेच पण, ती शांतपणे आणि लक्षपूर्वक ऐकली जातात. त्यांचा स्वभाव संयमी आणि मैत्रीपूर्ण असा आहे. तर, याच्या उलट परिस्थिती उध्दव ठाकरेंची आहे. त्यांच्या स्वभावात अहंकार, मग्रुरपणा ठायी ठायी जाणवतो. राजकारणाच्या परिपक्वतेचा तर पूर्णपणे अभाव आहे. यांच्या प्रत्येक भाषणात गद्दार, बाप चोरला, पक्ष चोरला, चिन्ह चोरले, निरर्थक शब्दांच्या कोट्या, मी मुख्यमंत्री होतो तेव्हा, थापा मारणे आणि न पेलणारी आव्हाने देणे या पलीकडे काहीच नसते. दूरदृष्टीपणा म्हणजे काय? हेच यांना माहित नाही. यांची, आदित्य आणि संजय राऊतची भाषणे 'करमणूक' आणि 'टाईमपास' म्हणून ऐकली जातात. जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून व वडिलांच्या विचारांना तिलांजली देऊन मुख्यमंत्रिपद मिळवले. पण, तेही सांभाळता आले नाही. पद तर घालवलेच पण, पक्ष, चिन्ह, आमदार, खासदार, नगरसेवक, कार्यकर्ते स्वतःची अपरिपक्वता आणि अहंकारी स्वभावामुळे घालवले. पण, खापर मात्र फडणवीस आणि अमित शहांवर फोडत आहेत.

राज हे उध्दवच्या हाताखाली काम करण्यास कधीच तयार होणार नाहीत. तेच जर करायचे होते तर, त्यांनी शिवसेना सोडून 'मनसे'ला जन्म देण्याचा आटापिटाच केला नसता. आज दोघांचेही पाय खोलात आहेत. भाजपने तगडे आव्हान त्यांच्यापुढे उभे केले आहे. शिंदे आणि अजितदादा येऊन मिळाल्यामुळे अजूनच अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे. दोघांच्याही अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे क्षणभर असे जरी मानले, की दोघांची युती झाली. पण, नेतृत्व, जागावाटप याचे काय? उध्दव ठाकरेंना तर सत्तेची किती चटक लागली आहे? हे मागील विधानसभा निवडणुकीवेळी सर्वांनी बघितलेच आहे. त्यामुळेच 'उघड्यापाशी नागडा गेला अन् रात्रभर थंडीने कुडकुडत मेला' अशी परिस्थिती होऊ नये, याची राज ठाकरे नक्कीच दखल घेतील, यात शंका नाही. त्याहीपेक्षा महत्वाची आणि मोठी गोष्ट म्हणजे, संजय राऊत, सुषमा अंधारे या वाचाळविरांचे आणि राज ठाकरेंचे पटेल का? हा खरा कळीचा मुद्दा आहे.

आता सर्वात महत्वाचे म्हणजे, हे कारभारी 'युती', 'आघाडी'च्या नावाखाली जनतेच्या डोळ्यात कशी 'धूळफेक' करतात? युत्या आणि आघाड्या या जनतेच्या नव्हे तर, केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी केल्या जातात, हे काही दिवसांतच समोर आले. काश्मीरमध्ये हिंदू आणि मराठी माणसांना दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार मारले. संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. इतर देशांनीही या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून मायदेशी परतले. गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्वरित काश्मीरला रवाना झाले. पण, २ दिवस आधीच 'महाराष्ट्राच्या' आणि 'मराठी' माणसाच्या हितासाठी युतीची भाषा करणारे अतिविद्वान संपादक आणि विश्वप्रवक्त्यांनी आपला पुळका किती बेगडी आहे, हे दाखवून सर्व महाराष्ट्राची इज्जत धुळीत मिळवली. मोदी, शहा, शिंदे आणि फडणविसांच्या द्वेषाची काविळ झालेल्या या महाशयांनी नेहमीप्रमाणेच गरळ ओकली. दहशतवादी हल्ल्याचा निषेध, मृतांना श्रध्दांजली वाहणे तर सोडा. या हल्ल्याला मोदी, शहा जबाबदार आहेत. तिकडे गेले म्हणजे उपकार नाही केले, शिंदेंचे तिकडे काय काम? अशी मुक्ताफळे उधळली. हे कमी की काय म्हणून, फक्त हिंदूच नव्हे तर, मुस्लिमही मारले गेले, असे म्हणत प्रत्यक्षदर्शी आणि पीडितांना खोटे पाडण्याचा करंटेपणाही या संपादक(?) म्हणवून घेणाऱ्या वाचाळविराने केला. पण, दोनच दिवसांपूर्वी 'महाराष्ट्र' आणि 'मराठी' माणसाच्या हिताच्या गोष्टी करणारे दोन्ही नेते मात्र, देश दुःखसागरात बुडाला असताना, परदेशी सहकुटुंब सहपरिवार 'थंडा थंडा, कुल कुल' करण्यात मशगुल होते, ते आले तर नाहीच. पण, साधं ट्वीटही केले नाही, याचा यांना विसर पडला. मागच्यावेळी फडणविसांनी मोठे मन केले, म्हणून मुंबई महानगरपालिका उध्दव ठाकरेंच्या हातात राहिली. आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे आता तसे होणार नाही. वक्फ बोर्ड आणि काश्मीर हल्ल्याबाबत केलेले वक्तव्य 'उबाठा' ला चांगलेच भोवणार आहे. मराठी मतदार नक्कीच दुखावला गेला आहे. मुंबई मनपा हातातून गेली तर, कायमचे 'लंडनवासी' व्हावे लागेल, या भीतीने युतीची खटपट चालू आहे, हे शेंबडे पोरगंही सांगेल.

दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना दोन्ही भाऊ एकत्र यावे किंवा युती व्हावी, असे कितीही वाटत असले तरी ते शक्य वाटत नाही. दोन भाऊ एकत्र येणे म्हणजे एखाद्या पक्षाचे विलिनकरण करावे लागेल. ते होणे नाही. युती म्हटले तर, नेतृत्वाचा प्रश्न उभा राहिल. आदित्य ठाकरेंनी 'संपलेल्या पक्षाविषयी काय बोलायचे'? अशी केलेली हेटाळणी; आणि राज यांनी बाळासाहेबांच्या अखेरच्या दिवसांत 'सूप आणि वडापाव'ची वाच्यता करून उध्दवाची काढलेली इज्जत; आणि २०१७ मध्ये मुंबई महानगरपालिकेत 'किंगमेकर'च्या भूमिकेत मनसे असताना, सत्तेसाठी एका रात्रीत उध्दव ठाकरे यांनी मनसेचे फोडलेले ६ नगरसेवक, माहीम विधानसभा मतदार संघात अमित ठाकरे यांना न दिलेला पाठिंबा या आणि अशा इतर टीका-टीपण्ण्या, घटना दोघे इतक्या सहजासहजी विसरतील का? हाही मोठा प्रश्न आहे. अतिविद्वान (?) विश्वप्रवक्ते यांनी 'शिवतीर्था'ला 'कॅफे हाऊस'ची उपमा दिली होती. पण, आज सरड्यापेक्षाही वेगाने रंग बदलत; आणि नाकाने कांदे सोलत रोज 'बेगडी' बोलत असले तरी लवकरच ते नित्यनियमाप्रमाणे तोंडावर आपटतील, यात तिळमात्र शंका नाही. कारण, मनोमिलन होण्यात ते स्वतःच मोठा अडसर आहेत. उध्दव पूर्ण पक्ष संपेपर्यंत काही त्यांना सोडणार नाही.

मागच्या आठवड्यात उध्दव ठाकरे म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या मनात जे आहे तेच घडेल'. ते अगदी बरोबर बोलले. स्वतःच्या बापाच्या विचाराला तिलांजली; आणि महाराष्ट्राच्या जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून आपला आणि मुलाचा स्वार्थ साधला. त्याची काही प्रमाणात परतफेड महाराष्ट्राने विधानसभा निवडणुकीत केलीच आहे. आता उरलेली परतफेड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत करून महाराष्ट्र आपला बदला नक्कीच पूर्ण करेल; आणि हेच महाराष्ट्राच्या मनात आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. थोडक्यात, उध्दवांच्या मनात जे आहे, ते कदापिही होणे शक्य नाही, असो.

'राज ठाकरेंच्या सभांना गर्दी होते पण, मते मिळत नाहीत' असे विधान करत शरद पवार यांनी 'मनोमिलना'त खोडा घातलाच आहे. राज आणि उद्धव यांच्यात अजूनही युतीसंदर्भात बैठक झाली नाही. युतीच्या टीका-टीपण्णीवरून प्रकाश महाजन आणि नारायण राणे यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. त्याचा फायदा 'उबाठा'ला होऊ नये म्हणून, योग्य वेळ साधत राजकारणातील 'खरे चाणक्य' फडणवीस यांनी राज यांची भेट घेऊन उध्दव ठाकरे यांना चांगलीच धोबीपछाड दिली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. राज ठाकरे आणि भाजप यांची जवळीक बघता ही बैठक राजकारणाला वेगळे वळण देईल, असे वाटणे चुकीचे ठरणार नाही. नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रवादीच्या (शरद पवार) वर्धापनदिनाच्या मेळाव्यात दस्तुरखुद्द शरद पवारांनीच दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीला पूर्णविराम दिला आहे. त्याचप्रमाणे आज 'उबाठा-मनसे'च्या 'मनोमिलना'च्या कितीही चर्चा होत असल्या तरी, या दोघांत युती होणार नाही, ही 'काळ्या दगडावरची पांढरी रेघ' आहे. 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'फुगवलेला हा फुगा' चाणक्य देवाभाऊंनी योग्य वेळ साधून राज यांची भेट घेऊन फोडला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. देवाभाऊंनी मारलेल्या 'मास्टर स्ट्रोक' मुळे शेवटी हे 'पेल्यातील वादळ'च ठरले, हे मात्र नक्की. कदाचित, उद्या उध्दव ठाकरेंना एकटे पाडण्यासाठी चाणक्य देवाभाऊंनीच ही खेळी खेळल्याचे उघड झाल्यास, आश्चर्य वाटायला नको.

*** प्रदीप व्ही. खोलमकर ***
**नाशिक. मोबाईल ८७६७५९२९८०**

# दुर्दैव कि जीवनमृत्युतील काळाचा अंतरपाट

अहमदाबाद विमान दुर्घटनेनं देशभरात हळहळ व्यक्त केली जात असून मृत्युमुखी पडलेल्या २४१ प्रवाशांसह नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या दुर्घटनेत आप्तेष्ट गमावलेल्या नातेवाईकांचा आक्रोश पाहून देवा! अशी वेळ कुणाच्याही वाटेला येऊ देऊ नको रे बाबा... अशी आर्त हाक अनेकांच्या हृदयातून येत आहे. तर, या दुर्घटनेनंतर काही जणांकडून आपणासोबत घडलेल्या विमान प्रसंगातील अशाच आठवणी जागवल्या जात आहेत.

गुजरातच्या अहमदाबाद येथील विमानतळावर विमान अपघाताची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेमध्ये अपघातग्रस्त विमानातील एक प्रवासी नशिब बलवत्तर म्हणून बचावला, इतर सर्वच्या सर्व प्रवाशांचा जीव गेला. एअर इंडियाच्या बोईंग विमानातील तब्बल २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याने देश शोक सागरात बुडाला असून अनेकांनी यापूर्वीच्या विमान दुर्घटनांच्या आठवणी जागवल्या आहेत. या अपघातामागील अनेक कारणांचा मागोवा घेतल्या जात असला तरी नेमकं कारण येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल.

यातील एक प्रवासी प्रतीक जोशी गेल्या सहा वर्षांपासून लंडनमध्ये राहत होते. एक सॉफ्टवेअर प्रोफेशनल, त्यांनी आपल्या पत्नी आणि भारतात राहणाऱ्या त्यांच्या तीन लहान मुलांसाठी परदेशात उज्ज्वल भविष्य घडवण्याचे स्वप्न पाहिले होते. वर्षानुवर्षे नियोजन, कागदपत्रे आणि संयमाने ते स्वप्न अखेरीस साकार होत होते. फक्त दोन दिवसांपूर्वी, त्यांची पत्नी डॉ.कोमी व्यास एक वैद्यकीय व्यावसायिक यांनी भारतातील नोकरीचा राजीनामा दिला. बॅगा पॅक झाल्या, निरोप घेतले गेले आणि भविष्य वाट पाहत होते. सकाळी, सर्व पाच जण आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फ्लाईट १७१ मध्ये चढले. सेल्फी काढला नि नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास. पण ते स्वप्नांच्या नगरीत पोहोचलेच नाहीत. विमान कोसळले आणि कुणीही वाचले नाही. काही क्षणात, आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. आई, वडील आणि त्यांच्या ३ मुलांची विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी... हा आनंद त्यांच्या ५ जणांच्या सुखी परिवारावर कधी दुःखाचा डोंगर घेऊन आला त्यांनाही समजले नाही.

विमान धावपट्टीवर सरकत होतं खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेले कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती. पोहोचल्यावर फोन करतो वाट पाहू नकोस. कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला शेवटचा फोटो पाठवला, कुणी ऑफिसच्या ग्रुपवर टेक ऑफ असा मॅसेज टाकला आणि कुणीतरी मनातल्या मनात एक प्रार्थना केली, सगळं नीट होऊ दे रे देवा. पण त्याच क्षणात काळाने आपली योजना आखली होती. एक मोठा आवाज, आगीचे ज्वाळा आणि एका क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळ असं सारं काही जागेवर होतं. फक्त माणसं नव्हती. उरली फक्त धूर, राख आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर फोनवरचे शेवटचे मॅसेज अजूनही वाचले गेले नाहीत. कॉल मी व्हेन यु लँड..., मिस यु... आणि टेक केअर...

यातच कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं, तर कुठे फोन कट झाल्यावर अजूनही हॅलो...हॅलो? म्हणणारं कुणी तरी. कुणीच ठरवत नाही की, शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल आणि शेवटचा शब्द कोणता असेल आज जे गेले, त्यांच्या हसण्याच्या प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहेत. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगते, आयुष्य क्षणभंगुर आहे त्यामुळे प्रत्येक क्षण प्रेमाने जगा आणि अगदी मनापासून माफ करा. मृत्यू अटळ आहे पण तो येईपर्यंत मृत्युशिवाय जगणं, हेच खरं आयुष्य आहे.

विमान दुर्घटनेत अचानक काळाच्या प्रवाहात हरवलेल्या त्या सर्व निष्पाप आत्म्यांना नम्र श्रध्दांजली!

**शब्दस्पर्शी**
**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

मुंबई उपनगरी रेल्वे वाहतूक अर्थात मुंबईची लोकलसेवा ही मुंबईची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज पाऊण कोटीहून अधिक मुंबईकर लोकल सेवेने प्रवास करतात. मात्र आज हीच मुंबईकरांची जीवनवाहिनी मुंबईकरांसाठी मृत्युवाहिनी ठरत आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. नुकतीच मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर मुंबईतील लोकल वाहतूक करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थात लोकल दुर्घटनेत मुंबईकरांचा जीव जाण्याची ही पहिली वेळ नाही. या आधीही अनेकांनी अशा दुर्घटनेत आपला जीव गमवला आहे. रेल्वे अपघातात दररोज पाच ते सात जणांचा मृत्यू होतो असा एक अहवाल सांगतो याचाच अर्थ रेल्वेचा प्रवास आता पूर्वी इतका सुरक्षित राहिला नाही. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. रेल्वे मंत्रालयाने या दुर्घटनेनंतर सर्व लोकलना स्वंयचलीत दरवाजे बसवण्याचे घोषित केले तर मुख्यमंत्र्यांनी सर्व लोकल वातानुकूलित करून लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची घोषणा केली. लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्यास अनेकांनी विरोध केला. लोकलमधील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित दरवाजे हा उपाय योग्य ठरणार नाही. स्वयंचलित दरवाज्यामुळे घुसमट होऊन



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

लोकलमधील प्रवाशांचा जीव गुदमरणार नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि तो योग्यही आहे. सर्वच लोकल वातानुकूलित करण्यास ही विरोध होतोय कारण लोकल वातानुकूलित केल्यावर तिकिटांचा दर वाढेल पर्यायाने सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा येऊ शकते. मुंब्रा दुर्घटनेनंतर अशी दुर्घटना घडू नये यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जात आहेत त्याचे स्वागतच व्हायला हवे मात्र मूळ प्रश्न हा मुंबईतील वाढत्या लोकसंख्येचा आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे सर्वच साधनसामुग्री अपुरी पडत आहे. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत केवळ परप्रांतीयच नाही तर खेड्यातूनही हजारो लोक मुंबईत रोजगारासाठी स्थलांतर करत असतात त्यामुळे मुंबईची सूज वाढत चालली आहे. कितीही आणि कोणत्याही उपाययोजना केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येपुढे अपुऱ्याच ठरणार आहे. त्यामुळेच शहरांचा नव्याने पुनर्विकास करण्याची गरज आहे मी माझ्या 'शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!' या लेखातच हे लिहिले आहे. जोवर शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणार नाही तोवर अशा घटना घडतच राहणार आणि त्यात मुंबईकरांचा जीव जातच राहणार आहे.

## अशोकायन...

### जागतिक पितृ दिन

प्रेम आणि धाक
एकाच नाण्याच्या बाजू
लेकराला मिळायलाच हवं
'माणुसकीचं 'बाळकडू ..
अव्यक्त प्रेम बापाचं
दिसत नाही डोळ्यानं
खुणा मात्र प्रेमाच्या
जाणवतात अनुभवानं ..
कोण म्हणते आई इतकी
बापाला नसते माया
आंधळं प्रेम केलं तर
औलाद जाते ना वाया ...



प्रा. अशोक सारडा, गेहकर.
(९४२२३९४३३९)

## आजचा विनोद

वेडा : बेकारीचा प्रश्न मी चुटकीसरसा सोडवू शकेन. सर्व स्त्रियांना एका बेटावर व पुरुषांना दुसऱ्या बेटावर.
डॉक्टर : पण त्यामुळे बेकारी कशी नष्ट होणार ?
वेडा : सगळेजण नौका बांधण्याच्या उद्योगात मग्न होतील ना ?

---

## SMS

Aapki Nayi Subah itni Sayani ho jaye,
Dukhon ki sari batein aapki purani ho jaye,
De jaye Itni khushiya ye din,
Ki Khushi bhi aapki diwaani ho jaye.

## वाचक लिहितात

### लॉस एंजलिस मधील हिंसाचार

अमेरिका एक जागतिक महासत्ता आहे. एक विकसित, संपन्न आणि स्वातंत्र्य प्रिय देश अशी अमेरिकेची ख्याती आहे. त्यामुळे सगळ्या जगाचा ओघ अमेरिकेकडे वाहतो आहे. अमेरिकन नागरिकही स्वतःला श्रेष्ठ ,शिस्तबद्ध ,आधुनिक आणि श्रीमंत म्हणून शेखी मिरवत असतात. पण प्रत्यक्षात काही काळापासून तसे दिसत नाही.

सध्या कॅलिफोर्नियातील, लॉस एंजलिस येथे हिंसाचार सुरू आहे. तो काही थांबायचं नाव घेत नाही. ट्रम्प सरकारने सत्तेत आल्यापासून अमेरिकेतील बेकायदेशीर नागरिकांना बाहेर काढायचा सपाटा सुरू केला आहे. भारतीय सहिष्णू असल्याने शांतपणे परतले .पण बहुसंख्येने अमेरिकेत बेकायदेशीर असलेले मेक्सिकन लोक हे गुन्हेगारी मानसिकतेचे असल्याने त्यांनी ह्या कारवाईच्या विरोधात हिंसाचार चालू केला. ट्रम्प च्या विरोधी पक्षाचे सरकार कॅलिफोर्निया राज्यात आहे. त्यामुळे स्थिती अधिक बिघडली. लॉस एंजलिस हे हॉलीवुड आणि आयटी कंपन्यांसाठी प्रसिद्ध आहे. तसेच डिज्नेलैंड्साठीही प्रसिद्ध आहे .त्यामुळे जगभरातून कामासाठी आणि पर्यटनासाठी लोक इथे येतात. आणि ह्या हिंसाचारामुळे सध्या सर्व व्यवहार ठप्प झाले आहे. दोन दिवसानंतरही सरकारला हिंसाचार थांबवता आला नाही, त्यामुळे ट्रम्प यांनी तिथे थेट सैन्याला पाठवले. कारण ही आग जर लवकर विझवली नाही तर तिचा वणवा संपूर्ण अमेरिकेत पसरेल याची जाणीव ट्रंप यांना निश्चितच झाली असणार. परंतु त्यामुळे आणखी एक वेगळा वाद निर्माण झाला. महासत्ता म्हणून जगातील देशांचे युद्ध थांबवण्याचा दावा करणारी अमेरिका ,स्वतःच्या देशातील, एका राज्यातील, एका शहरातील हिंसाचार थांबवू शकत नाही. या हिंसाचारामुळे अमेरिकेची जगभर नाचक्की होत आहे.

तसेच प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. प्रत्येकच देशाला घुसखोर नको असतात. कारण 'ते' त्या देशातील अर्थकारण, रोजगार, संस्कृती यावर आक्रमण करतात .भारतातही घुसखोरीचा प्रश्न ऐरणीवर आहे. भारत सरकारने सुद्धा आता बांगलादेशी घुसखोरांच्या बाबतीत कडक धोरण अवलंबिले पाहिजे. हीच ती वेळ आहे .कारण आता अमेरिकेच्या तोंडालाच पट्टी लागलेली आहे .

**सौ. माधवी पत्की**
**नागपूर**

### स्त्रीसन्मान : संस्कृतीची खरी ओळख!

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः! जेथे नारीची पूजा केली जाते, तेथे देवतांचा वास असतो, अशी हिंदू धर्माची शिकवण आहे. हिंदू संस्कृतीत स्त्रीला 'शक्ती'चे रूप मानले गेले आहे. प्राचीन काळात स्त्रीला केवळ एक सामाजिक घटक नव्हे, तर हिंदू 'संस्कृतीचा कणा' या दृष्टीने सन्मानाने पाहिले जात होते.

आजच्या आधुनिक समाजात स्त्रियांना कायदेशीर अधिकार, समानता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळत आहेत. मात्र, प्राचीन भारतात स्त्रियांना मिळणारा मान आणि सन्मान आजच्या २१व्या शतकात हरवलेला दिसतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे! केवळ हुंडाबळीच नव्हे, तर स्त्रियांवरील मानसिक व शारीरिक शोषण, बलात्काराच्या वाढत्या घटना या सर्वांवरून समाजाची स्त्रीकडे बघण्याची विकृत मानसिकता स्पष्ट होते.

म्हणूनच, केवळ कायद्याच्या आधारे नव्हे, तर समाजाची मानसिकता बदलल्यावरच खऱ्या अर्थाने स्त्रीसन्मानाची परंपरा जोपासली जाऊ शकते. यासाठी प्रत्येक घरात साधनेचा संस्कार होणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्राचीन हिंदु संस्कृतीतील स्त्री सन्मानाची मूल्ये जोपासण्यास मदत मिळेल आणि समाजातील मानसिक विकृतींवर आळा बसेल.

**सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा**

# रमाईच्या सहकार्यामुळे बाबासाहेब यशस्वी झाले
# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : बाबासाहेब आंबेडकरांना सावली सारखी साथ दिली. त्यांच्या कार्यात त्या खंबिरपणे पाठिशी राहिल्यात यामुळंच बाबासाहेब यशस्वी होऊ शकले असे प्रतिपादन केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. यावेळी माजी खासदार प्रा. जोंगेंद्र कवाडे, बानाईचे अध्यक्ष अरविंद गेडाम व आषुतोष शेवाळकर प्रामुख्याने उपस्थित होते. राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाच्या वतीने आयोजित व राम शेवाळकर प्रतिष्ठान द्वारा निर्मीत रमाई या एकपात्री नाटकाच्या रौप्य महोत्सवी प्रयोग सायंटिफिक सभागृहात सादर झाला.




यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ नाटककार प्रभाकर दुपारे लिखीत आणि शंकर शंखपाळे दिग्दर्शित या नाटकाचे सादरीकरण प्राची दाणी यांनी केले. तासभर प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या या नाटकाचा प्रयोग ना. गडकरी यांनी बघितल्या नंतर त्यांच्या हस्ते कलवंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी या प्रयोगावर भाष्य करतांना गडकरी म्हणाले की, मोठ्या आणि कर्तुत्ववान माणसांच्या यशस्वी वाटचालीसाठी घरांतील महिलेची साथ अतिशय महत्वाची असते. ही साथ आणि सहकार्य मिळाले तर सहज यश गाठू शकतो.

**प्रभावी शब्दांकन**

यावेळी बोलतांना गडकरी यांनी प्रभाकर दुपारे यांनी या नाटकात जे शब्दांकन केले ते अतिशय प्रभावी असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी गडकरी यांच्या हस्ते लेखक प्रभाकर दुपारे, दिग्दर्शक शंकर शंखपाळे, रमाई सादर करणाऱ्या प्राची दाणी, मंजुश्री डोंगरे, चंद्रकांत सोरटे, कमल वाघधरे, प्रकाश योजना अजय कारंडे, संगीत मिलिंद रहाटगावकर, भूषण दाणी, राजू अलोणे, हेमंत डिके, यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन मंजुश्री डोंगरे यांनी केले. व प्रास्ताविक वाचनालयाचे कार्यवाह अनील चनाखेकर यांनी केले. यावेळी मोठ्या संख्खेने प्रेक्षक उपस्थित होते. या नाटकाचे महाराष्ट्रभर ठिकठिकाणी प्रयोग झाले.

## रस्त्यावर जगणाऱ्या ११५ निराधारांचे पुनर्वसन
### मिशन मुक्ती अंतर्गत पोलिसांचा कौतुकास्पद उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : बेघर, निराधार आणि मानसिक आजारी व्यक्तींचे जगणे कठीण असते. त्यांना रस्त्यावरच जगावे आणि मरावे लागते. त्यांचे पुर्नवसन व्हावे, अशी भावना पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी व्यक्त केली. त्यांच्या विचाराला विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांचे सहकार्य मिळाले आणि मिशन मुक्ती मोहिमेला सुरुवात झाली. या मोहिमेंतर्गत ११५ निराधार, बेघर, भिक्षेकरी तसेच मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्तींचे पुनर्वसन करण्यात आले. या मोहिमेत सहकार्य करणाऱ्या सर्वांचा स्मृतिचिन्ह देऊन पोलिस आयुक्तांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पोलिस, महापालिका, वैद्यकीय महाविद्यालय, मानसिक रुग्णालय, समाजकल्याण विभाग, महिला आणि बाल कल्याण विभाग, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अशा विविध शासकीय यंत्रणा एकत्र आल्या. स्वयंसेवी संस्थांनी आपली सेवा, मन आणि संसाधने दिली. या एकत्रीकरणातून एक स्पष्ट आराखडा तयार झाला. महाराजबाग, सीताबर्डी स्टेशन, राम झुला अंडरब्रिज, मोमिनपुरा, धंतोली, यशवंत स्टेडियम अशा अनेक भागांमध्ये मोहीम राबविली.

**...तर नागपूर भिकारीमुक्त शहर**

हीच एकजूट राहिली, समन्वय आणि समर्पण कायम राहिले तर नागपूरदेखील इंदूरसारखे भिकारीमुक्त शहर बनू शकते, असे प्रतिपादन पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी केले. एका शहराचे खरे मोठेपण त्याच्या गगनचुंबी इमारतींमध्ये नसून तळाशी असलेल्या माणसांशी केलेल्या वागणुकीत असते. मिशन मुक्ती आपल्याला हिच आठवण करून देते की, सहवेदना ही धाडसाचे सर्वोच्च रूप आहे आणि जेव्हा एक शहर दुर्लक्षितांचा आवाज ऐकायला लागते तेव्हाच ते आपला खरा चेहरा शोधू लागते.

यासाठी वाहतूक विभागाने आवश्यक वाहने उपलब्ध करून दिली. इमामवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या राजा बक्षा हनुमान मंदिरापासून सुरुवात झाली.

पहिल्या टप्प्यात २३, दुसऱ्या टप्प्यात ३०, इतर पोलिस ठाण्यांच्या स्वप्रेरित कारवाईतून २३, पोलिस निरीक्षक पंडित यांच्याकडून १८ आणि इतर आठ पोलिस ठाण्यांमधून २१ अशा पद्धतीने बेघरांना आधार देण्याचे काम पोलिस आणि विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांनी केले.

## गोरेवाडा तलावात २ युवकांना जलसमाधी
### मानवतानगरात पसरली शोककळा

**नागपूर:** मित्रांसोबत प्रार्टीसाठी गेलेल्या दोन युवकांचा गोरेवाडा तलावात बुडून मृत्यू झाला. प्रचंड उकाळा असल्याने दोघेही पाण्यात आंघोळीसाठी उतरले होते. दारूच्या नशेत असल्याने त्यांना पाण्याच्या अंदाज घेता आला नाही. काही वेळातच ते गटांगळ्या खाऊ लागले आणि क्षणात दिसेनासे झाले. ही धक्कादायक घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सतीश रामराज देशभ्रतार (१८) आणि अनिकेत धनराज बडगे (१८) दोन्ही रा. मानवतानगर, टीव्ही टॉवर अशी बुडालेल्या युवकांची नावे आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास देशमाने पथकासह घटनास्थळी पोहोचले. मनपा अग्निशमन यंत्रणा आणि आपत्ती व्यवस्थापक विभागाला माहिती दिली. रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. या प्रकरणी पोलिसांनी नोंद केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सतिश हा पेंटीगचे काम करायचा. त्याचे वडील ई-रिक्षाचालवितात. अनिकेत हा एका खाजगी रुग्णालयात काम करीत होता. शनिवारी सकाळी दोघेही परिसरातच राहणारे मित्र साहिल कैलास चौरे (२१), यश आदेश उके (१७) आणि कुणाल सुधाकर उके (१३) यांच्यासोबत पार्टी करण्यासाठी गोरेवाडा तलाव परिसरात गेले होते. तलावाच्या काठावर सर्वांनी दारू प्यायली. पाच जणांपैकी कोणालाच पोहता येत नव्हते. त्यामुळे ते तलावाच्या काठाने उभे होते. काही वेळाने साहिल, यश आणि कुणाल हे मोबाईलने सेल्फी घेत काही अंतरावर निघून गेले. त्याच दरम्यान सतीश आणि अनिकेत आंघोळ करण्यासाठी तलावाच्या पाण्यात उतरले. दोघेही दारूच्या नशेत असल्याने त्यांना पाण्याचा अंदाज घेता आला नाही. ते गटांगळ्या खावू लागले अन पाहता-पाहतापाण्यात बुडाले. काही वेळात सौरभसह तिघेही परत आल्यावर त्यांना दोघांचेही कपडे काठावर आढळून आले. मात्र, सतिश आणि अनिकेत कुठेच दिसत नव्हते. त्यांनी आरडाओरड करण्यास सुरूवात केली. त्यातून आजूबाजूच्या नागरिकांनी परिसर गाठला. माहिती मिळताच गिट्टीखदान पोलिस घटनास्थळी पोहोचले. आपत्ती व्यवस्थापक विभाग आणि मनपाच्या अग्निशमन यंत्रणेलाही माहिती देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध सुरू होता. याप्रकरणी पोलिसांनी नोंद केली आहे.

## दारूसाठी मित्रावर वस्तऱ्याने हल्ला
### लकडगंज परिसरातील घटना, आरोपी ऑटो चालक अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : दारू पाजण्यास नकार दिला म्हणून एका ऑटो चालकाने आपल्या मित्रावरच वस्तऱ्याने हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना शनिवारी दुपारी १.३० लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत केटा कॉलनी मार्गावर घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. नीलेश राजेश नगराळे (२७) रा. बौद्धपुरा, लकडगंज असे जखमीचे नाव आहे. तो जखमी अवस्थेतच स्वतः रिक्षा चालवत लकडगंज पोलिस ठाण्यात पोहोचला आणि घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांना त्याच्या छातीवर २५ टाके लावावे लागले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. अशोक मेंढे (४५) रा. गोरेवाडा बोरगाव असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

नीलेश आणि अशोक हे दोघेही ऑटो चालक असल्याने त्यांच्यात मित्रता आहे. दोघेही सुभाष पुतळा ते पारडीदरम्यान ऑटो चालवतात. ते नेहमी सोबत बसून दारू पित होते. शनिवारी दुपारी नीलेश सुभाष पुतळा चौकातील ऑटो स्टॅन्डवर उभा होता. दरम्यान अशोक तेथे आला. त्याने नीलेशला दारू पाजण्यास म्हटले. दोघांनीही केटा कॉलनी परिसरातील एका बारमध्ये जाऊन मद्यप्राशन केले. त्यानंतर नीलेश जाण्यासाठी निघाला. मात्र अशोकने त्याला आणखी दारू पाजण्यास म्हटले. नीलेशने त्याला आणखी दारू पाजण्यास नकार दिला आणि ऑटोजवळ परतला. दारूच्या नशेत असलेल्या अशोकने नीलेशला आणखी दारू प्यायची असल्याने पैशांची मागणी केली. नीलेशने त्याला पैसे देण्यासही नकार दिला. यामुळे अशोक चिडला आणि नीलेशला शिविगाळ सुरू केली. नीलेशने त्याला विरोध करीत अशोकच्या कानशिलात लगावली. यामुळे अशोक आणखी चिडला. त्याने जवळ असलेला वस्तरा काढून नीलेशवर हल्ला केला. त्याच्या छातीवर वार करून गंभीर जखमी केले. नीलेशने जीव वाचविण्यासाठी तेथून पळ काढला. जखमी अवस्थेतही ऑटो चालवत त्याने थेट लकडगंज पोलिस स्टेशन गाठले आणि घटनेची माहिती दिली. पोलिसांनी प्रसंगावधान राखत तात्काळ नीलेशला त्याच्याच ऑटोतून मेयो रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे त्याच्या जखमेवर २५ ते ३० टाके लावण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी अशोकला अटक केली. पुढील तपास सुरू आहे.

## सेमिनरी हिल्स परिसरात तीन दिवस सकाळी वीज नाही नागरिकांनी सहकार्य करावे, महावितरणचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : मान्सूनपूर्व अत्यावश्यक देखभाल, दुरुस्ती तसेच नव्याने बसविण्यात आलेल्या रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) चार्जिंगच्या कामांसाठी महावितरणने सेमिनरी हिल्स परिसरात वीज बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार, दिनांक १६ जून ते बुधवार, दिनांक १८ जून या तीन दिवसांसाठी सकाळी ठराविक वेळेत वीजपुरवठा खंडित राहील. महावितरणच्या सिव्हिल लाइन्स विभागातील सेमिनरी हिल्स शाखा कार्यालयांतर्गत येणाऱ्या विविध वाहिन्यांवर हे काम केले जाणार असल्याने या भागातील वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

या नियोजित कामाम्मुळे सोमवार, १६ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत ११ केव्ही एमकेसीएल वीज वाहिनीवरील पशुवैद्यकीय चौक, गजानन सोसायटी, सुरेंद्र गड, मानव सेवा, एलएडी स्क्वेअर, केंद्रीय विद्यालय, फुटाळा, मलबार कॉलनी या परिसरातील वीजपुरवठा बंद राहील. तर, मंगळवार, दि. १७ जून रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही गौरखेडे वीज वाहिनीवरील गौरखेडे कॉम्प्लेक्स, हिंगोली बिका सोसायटी, फ्रेंड्स कॉलनी, फ़ाळले ले-आउट, कोलबास्वामी सोसायटी, नेताजी सोसायटी या भागातील वीजपुरवठा खंडित होईल. याशिवाय, बुधवार, दि. १८ जून रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही आकारनगर वीज वाहिनीवरील आकार नगर, स्वामी कॉलनी फेज-१, स्वामी कॉलनी फेज-२ज़गदीश नगर, प्रेरणा नगर, गंगा नगर, केजीएन सोसायटी, वेलकम सोसायटी, अखिल विश्व भारती सोसायटी, वीरचक्र कॉलनी, विघ्नहर्ता कॉलनी, एम.बी. इस्टेट, हिंद प्रेरणानगर, रक्षानगर, विद्यानगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

महावितरणने ग्राहकांना होणा-या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त केली असून, नागरिकांनी या काळात पिण्याचे पाणी, लिफ़्ट यासारख्या आपल्या आवश्यक कामांचे नियोजन करून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## नागपूरमधील २२ केंद्रांवर महाराष्ट्र सेट परीक्षा सुरळीत पार पडली

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (एम-सेट) नागपूर केंद्रावर घेण्यात आली. एसपी पुणे विद्यापीठ ही या परीक्षेसाठी नोडल एजन्सी आहे. नागपूरमधील २२ महाविद्यालयीन केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. नागपूर केंद्रावर एकूण ९२८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती त्यापैकी ७५५३ विद्यार्थी (८३%) प्रत्यक्षात शहरातून बसले होते. प्रत्येक केंद्रावर सेट कार्यालयाने नियुक्त केलेल्या बाह्य निरीक्षकांनी देखरेख केली. कोणतीही गैरसोय न होता परीक्षा सुरळीत पार पडली.



## रामटेक तालुक्यातील गुगुलडोहला ग्रामपंचायतीचा दर्जा

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक , दि. १५ :
ग्रामीण विकास विभागाकडून १० जून २०२५ मध्ये जारी केलेल्या आदेशानुसार, गुगुलडोह हे स्वतंत्र महसूल गाव आणि पांचाळा ग्रामपंचायत हे स्वतंत्र महसूल गाव म्हणून घोषित करण्यात आले. रामटेक विधानसभा क्षेत्रा चे आमदार तथा राज्य मंत्री आशिष जयस्वाल यांच्या प्रयत्नांमुळे हे साध्य झाले आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.सात वर्षांनंतर, रामटेक तहसीलमधील गुगुलडोह येथील नागरिकांची मागणी पूर्ण झाली आहे. पांचाळा (बु.) ग्रामपंचायतीचे विभाजन करून, गुगुलडोह आता स्वतंत्र ग्रामपंचायत करण्यात आली आहे. ते बनवण्यात आले आहे. ग्रामपंचायत विसर्जित केल्यानंतर प्रशासक त्याचा कारभार पाहतील. ग्रामपंचायत निवडणुकीनंतर प्रशासन लोकप्रतिनिधींच्या हाती जाईल. तत्कालीन जिल्हा परिषद सदस्या शोभा झाडे आणि पांचाळा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संजय झाडे २०१९ पासून ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याचा प्रयत्न करत होते.

रामटेक तहसीलमध्ये १५७गावे आहेत आणि ही सर्व गावे ४५ ग्रामपंचायतींमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. गुगुलडोह गाव पूर्णपणे आदिवासी गाव म्हणून ओळखले जाते. सध्या या गावाची लोकसंख्या १३०० आहे.हे गाव पंचाळापासून ५ किलोमीटर अंतरावर आहे. दोन्ही गावाला जोडण्यासाठी इथे धड रस्ताही नाही. या कारणामुळे नागरिकांसह कर्मचाऱ्यांनाही प्रत्येक वेळी जंगलाची वाट तुडवीत जावे लागत होते. त्यामुळे पंचाळा (बु) ग्रामपंचायतचे विभाजन करून गुगुलडोह वेगळी ग्रामपंचायत करण्यात यावी असा प्रस्ताव पंचाळा ग्रामपंचायतने पंचायत समिती रामटेकडे सादर केला होता. नंतर माजी जिल्हा परिषद सदस्य संजय झाडे यांनी याबाबत सतत पाठपुरावा केला. अखेर राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रयत्नातून गुगुलडोह ग्रामपंचायत वेगळी करण्याचा आदेश निघाला आहे.

रामटेक तालुक्यात अनेक गावे दुर्गम भागात आहेत. यात अनेक गावे घनदाट जंगलांनी व्यापली आहेत. यामध्ये कांद्री, कांद्री माईन, बोथिया-पालोरा, पवनी, उमरी, मांगली, गुडेगाव, महादुला, लोहारा, घोटीटोक ही गावेही वेगळी ग्रामपंचायत होण्याची वाट पाहत आहेत.

## उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण नागपूर

**नागपूर, दि. १५ :**अत्यावश्यक दुरुस्तीसाठी गीता मंदिर वाहिनीवरील वीजपुरवठा आज सकाळी बंद नागपूर, १५ जून २०२५: महावितरणच्या वतीने उद्या, सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी सकाळी ८:०० ते दुपारी १२:३० वाजेपर्यंत ११ के.व्ही. संत्रा मार्केट वाहिनीवर अत्यावश्यक देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. यामुळे गीता मंदिर वाहिनी अंतर्गत येणाऱ्या काही परिसरातील वीजपुरवठा बंद राहणार आहे. यामुळे संत्रा मार्केट, मोहन पटेल गेट, बजेरिया, मच्छी मार्केट आणि लोधीपुरा या परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित होईल. या कामामुळे वीज ग्राहकांना होणाऱ्या त्रासासाठी महावितरणने दिलगिरी व्यक्त केली आहे. तसेच, सर्व वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, अशी विनंती महावितरणने केली आहे.

# ‘पुण्यश्लोक देवी अहल्याबाई’ एकपात्री प्रयोगाला प्रतिसाद

### डॉ. दीपाली घोंगे यांचे उत्कृष्ट सादरीकरण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :
विदर्भ साहित्य संघातर्फे पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित 'पुण्यश्लोक देवी अहल्याबाई' या सुप्रसिद्ध नाट्यकलावंत दीपाली घोंगे यांच्या एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले. त्याला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. डॉ. दीपाली घोंगे यांनी अल्पावधित अहल्याबाईचा जीवनप्रवास उपस्थितांना साभिनय घडविला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते उपस्थित होते.

तसेच सरचिटणीस विलास मानेकर, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र डोळके, ग्रंथालय प्रमुख डॉ. विवेक अलोणी उपस्थित होते. शारदास्तवन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वैयक्तिक आयुष्यापासून राजकारणापर्यंतचा त्यांचा प्रवास दीपाली यांनी अतिशय बोलक्या पद्धतीने सादर केला. देवधर्म आणि राष्ट्रधर्म एकच असल्याचे त्यांनी त्यांच्या जीवनातून सांगितले.

माणकोजी शिंदे यांची कन्या मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव यांची पत्नी झाली. ज्या काळात स्त्रियांना शिक्षण घेणे अवघड अशा काळात मल्हारराव होळकरांनी आपल्या सुनेला युद्धशास्त्र, धर्मशास्त्र शिकवले. शस्त्र आणि शास्त्र, तसेच नीतीमत्ता याबाबत त्यांना ज्ञान दिलं. परंतु एका युद्धात त्यांचे पती खंडेराव यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या आयुष्यात वादळ निर्माण झाले. त्यावर त्यांनी कशा पद्धतीने मात केली याचे अतिशय चांगले सादरीकरण त्यांनी केले. राजकीय डावपेच, न्यायप्रियता, सात्विकता, योग्य निर्णयक्षमता अशा त्यांच्या गुणांमुळे त्या लोकप्रिय ठरल्या.

मनोरंजनातून समाजप्रबोधन करणे हा त्यांचा प्रयोग सादर करण्यामागील मुख्य उद्देश असून युवा पिढीला अहल्याबाईचा इतिहास माहिती व्हावा याकरिता दीपाली घोंगे शाळा-कॉलेजेसमधूनही याचे सादरीकरण करतात.

या प्रयोगाचे लेखन, दिग्दर्शन त्यांनी स्वतः केले असून त्यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने रसिकांना खिळवून ठेवले. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. विवेक अलोणी यांनी केले.

प्रयोगानंतर प्रदीप दाते व विलास मानेकर यांनी त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

## तिरळे कुणबी मंडळाच्या वतीने १० वी व १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शनावर व्याख्यान ६ जुलै रोजी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : तिरळे कुणबी सेवा मंडळ, नागपूर द्वारा आयोजित १० वी व १२ वी मध्ये उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह व करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान तिरळे कुणबी सेवा मंडळ, नागपूरचे विद्यमाने सन २०२४-२५ मध्ये १० वी १२ वी इयत्तांमध्ये उच्च गुणवत्ता मिळिवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा रविवार दि.६ जुलै २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता 'तिरळे कुणबी सेवा मंडळ टाऊन हॉल', मौजा-बिडीपेठ, आशिर्वाद नगर, नागपूर येथे आयोजित केलेला आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पुढील करीअर भविष्या संदर्भात सुयोग्य मार्गदर्शनासाठी मा.डॉ. प्रा.आशिष तायवाडे, जेष्ठ समुपदेशक व अभियंता यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान ठेवलेले आहेत. सबब सत्कार सोहळ्यासाठी समाजातील गुणवंत विद्यार्थी व पालक ह्यांनी विद्यार्थांची मार्कस्शिट व आवश्यक माहिती मंडळाचे कार्यालय, 'तिरळे कुणबी सेवा मंडळ टाऊन हॉल', मौजा-बिडीपेठ,आशिर्वाद नगर येथे कार्यालयात सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत सादर करावे. किंवा प्रत्यक्ष आणून देणे. शक्य नसल्यास खालील वाटस्अप नंबर वर पाठवावे.अध्यक्ष पी.बी.वाकडे पाटील - ९९२०२८२३७७ सचिव --नितीन हांडे - ९०४९०९१९९० तसेच तिरळे कुणबी सेवा मंडळाच्या नविन कार्यालया चे उद्घाटन सोहळा ह्या वेळेस पार पडणार आहे. समाज बांधवांना विनंती करण्यांत येते की, गुणवंत विद्यार्थ्यांनी व इतरांनी सुध्दा ह्या संधीचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त मोठ्या संख्येने वरील कार्यक्रमास उपस्थित राहा-वे. असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

## जगदगुरु भगवान शंकराचार्य यांची सिनिअर भोसला पॅलेस निवासस्थानी सदिच्छा भेट

**नागपुर:** स्वामी श्री सदानन्द सरस्वती जी महाराज यांनी दि. १४जून २०२५ रोजी नागपुर महाराज श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोंसले यांच्या सिनिअर भोसला पॅलेस निवासस्थानी सदिच्छा दिली. यावेळी राजपरिवाराच्या वतीने शंकराचार्यांचे पाद्यपुजन करून स्वागत करण्यात आले. यावेळी *श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (पाचवे), नागपूर युवराज श्रीमंत राजे जयसिंह भोंसले, मध्यप्रदेश मा राज्यमंत्री दर्जा हेमंत देशमुख, अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष ठाकुर किशोरसिंह बैंस, मुलताई उपनगराध्यक्ष शिवकुमार माहुरे, नगरसेवक व मा स्थायी समिती अध्यक्ष सुधीर (बंडु) राऊत नगरसेविका चेतना राजु टांक छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे सचिव मंगेश डुके यांच्यासह महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य गण प्रामुख्याने उपस्थित होते.





**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SAMEER KHAN SHEKH LAL.** NOW MY NEW NAME IS **AAMIR QURAISHI SHEKH LAL QURAISHI.**
**ADD** : PLOT NO 76, NEAR WATER TANK, GUNDPURA, UPASE LAYOUT, KAMPTEE 441002

MY OLD NAME WAS **ANISA / ANISA NEYAMATULLA.** NOW MY NEW NAME IS **ANISA PARVIN.**
**ADD** : HOUSE NO A/159, A BLOCK, NEW KAMPTEE 441001

MY OLD NAME WAS **SANJAYKUMAR BALASAHEB PAWAR.** NOW MY NEW NAME IS **SANJAY BALASAHEB DESHMUKH.**
**ADD** : AT PANKANHERGAON TQ SENGAON DIST HINGOLI - 431542

MY OLD PASSPORT NO. **H5558645.** MY OLD NAME WAS **MOHAMMAD ISLAM MOHAMMAD MUKHTAR.** NOW MY NEW NAME IS **MOHD ISLAM AND SURNAME IS ANSARI.**
**ADD** : ANSAR NAGAR MOMINPURA NAGPUR - 440018

MY OLD PASSPORT NO. **4475735.** MY OLD NAME WAS **MOHMMAD SHAIF SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH SHARIF SHAIKH BALDAR.**
**ADD** : H NO 549 MOHD ALI SQUARE BHALDARPURA NAGPUR - 440018

MY OLD PASSPORT NO. **4475735.** MY OLD NAME WAS **AFSANA PARVEEN SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **AFSANA PARVEEN SHEIKH SHARIF.**
**ADD** : H NO 549 MOHD ALI SQUARE BHALDARPURA NAGPUR - 440018

MY OLD PASSPORT NO. **4476073.** MY OLD NAME WAS **MOHAMMAD SHARIF SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH SHARIF SHAIKH BALDAR.**
**ADD** : H NO 549 MOHD ALI SQUARE BHALDARPURA NAGPUR - 440018


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

कॅलिडोस्कोप

# इथं चालतो ताऱ्यांचा खेळ!



हल्ली रात्रीच्या वेळी आकाशात पाहिलं तर लुकलुकणारे तारे, चांदण्या दिसण्याचं प्रमाण तुलनेनं बरंच कमी झालं आहे. यामागे शिश्रक कारणं आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे असं होऊ शकतं. पण अशा परिस्थितीतही भारतात निसर्गाचा एक कमाल आविष्कार प्रत्येकालाच आश्चर्यचकित करत आहे.

हा आविष्कार म्हणजे भारतातील अतिशय दुर्गम भागात असणारं एक लहानसं गाव. इथं बाहेरचं कोणी गेलं तर त्यांची दमछाक होते, थंडीनं दातखिळी बसते. इथं दूरदूरपर्यंत कोणीच नसल्यामुळं रात्रीच्या वेळी नुसतं बाहेर वावरणंही धडकी भरवतं. जगातील आणि भारतातील काळोख्या रात्रींसाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि आकाश अगदी सहजपणे दिसणाऱ्या या ठिकाणाचं, या गावाचं नाव आहे हानले.

**पर्यटकांचा ओघ सुरू**

लडाखच्या पूर्व भागात, चांगथांग पठारावर हे लहानसं गाव आहे. लेहपासून ते साधारण २५० किलोमीटर अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून हे गाव साधारण ४,५०० मीटर (१४,७६० फूट) उंचीवर वसलेलं आहे. ते आपल्या निसर्गरम्य सौंदर्यासह खगोलशास्त्रीय महत्त्वासाठीही प्रसिद्ध आहे. मागील काही वर्षांमध्ये हानलेमध्ये पर्यटकांचा ओघ वाढला असून, याला खगोलशास्त्रीय पर्यटन असंही नाव देण्यात येत आहे.

**जगातील सर्वात उंचावरील वेधशाळा**

हानले येथील वेधशाळा ही जगातील सर्वात उंचावरील वेधशाळांपैकी एक आहे. ही वेधशाळा आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संस्थांकडून विविध निरीक्षणपर कामांसाठी वापरली जाते. हानलेमध्ये फारच कमी वस्ती आणि कोणतेही शहरीकरण नसल्यामुळं इथं कृत्रिम प्रकाशाचा प्रचंड अभाव आहे. त्यामुळे येथील रात्री सर्वाधिक काळ्याकुट्ट आणि मनात धडकी भरवणाऱ्या असतात. २०२२ मध्ये हानले हे ठिकाण भारताचं पहिलं 'डार्क स्काय रिझर्व्ह' म्हणून घोषित करण्यात आलं आणि साऱ्या जगाचं लक्ष या ठिकाणानं वेधलं. खगोल अभ्यासक आणि ग्रहताऱ्यांमध्ये रमणाऱ्यांसाठी हानले म्हणजे एक पर्वणीच.

**आकाशगंगा दिसते अगदी सहज**

दिवस मावळतीला गेल्यानंतर आणि आकाश निरभ्र असेल तेव्हा हानलेमध्ये रात्रीच्या अंधारात काही अद्वितीय दृश्य आणि ग्रहतारे पाहता येतात. 'मिल्की वे' आणि इतर आकाशगंगा इथून अगदी सहजपणे आणि दुर्बिणीशिवाय पाहता येतात. उल्का वर्षाव, निखळणारे तारे, उल्कावर्षाव, चंद्र, ग्रह आणि उत्तरेकडील प्रकाशरेषा असा अद्भूत नजराणा हानले इथं येणाऱ्या प्रत्येकापुढं सादर करतं. लेहपासून इथं येण्यापर्यंतचा प्रवास तुलनेनं अधिक खडतर आहे. शिवाय हा भाग चीन सीमेनजीक येत असल्यानं अनेकदा इथं काही संवेदनशील भाग ओलांडून पोहोचावं लागतं. प्रवास कितीही मोठा असला तरी हानलेमध्ये येऊन आपल्याला नगण्य भासवणारी भव्य आकाशगंगा आकाशात दिसते तेव्हा इथं येण्याचं चीज झाल्याचीच एकमेव भावना मनात घर करते.

# थायलंडमध्ये मांजरीला अटक




बँकॉक पोलिसांनी अडकलेल्या एका मांजरीची सुटका केली आणि तिला परत अटक केली. प्रत्यक्षात, सुटका केल्यानंतर, मांजरीने पोलिस अधिकाऱ्यांना अनेक वेळा चावा घेतला. म्हणूनच तिला अटक करण्यात आली. आता मांजरीचा 'मगशॉट' व्हायरल होत आहे. पोलिसांनी मांजरीची काळजी घेण्यास सुरुवात केली आहे. बँकॉक पोलिस अधिकारी दा परिंदा पाकिसुक यांनी हरवलेल्या अमेरिकन शॉर्टहेअर मांजरीची असामान्य कहाणी शेअर केली.

साउथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार त्यांनी मांजरीचे चांगले स्वागत केले आणि तिची काळजी घेण्यास सुरुवात केली. आम्हाला प्रेम देण्याऐवजी, गोंडस गुलाबी हार्नेस घातलेली मांजर अनेक पोलिस अधिकाऱ्यांना ओरबाडू लागली आणि चावू लागली. या मांजरीचे नाव नाब तांग आहे. त्याचा अर्थ 'पैसे मोजणे' असा होतो. एका अधिकाऱ्याने लिहिले, की या मांजरीवर पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे आणि तिला ताब्यात घेण्यात आले.

**पोलिस अधिकाऱ्याचा काल्पनिक अहवाल**

अधिकाऱ्याने सांगितले, ती सध्या सर्वोत्तम जीवन जगत आहे. पोलिसच खरे बळी आहेत. पोस्ट व्हायरल होताच अनेकांनी मांजरीला दत्तक घेण्यात रस दाखवला, परंतु आपली प्राथमिकता तिचा खरा मालक शोधणे असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मांजरीचा मालक दुसऱ्या दिवशी पोलिस ठाण्यात पोहोचला. कथेला एक मजेदार शेवट देण्यासाठी अधिकाऱ्याने मांजरीच्या दृष्टिकोनातून एक काल्पनिक पोलिस अहवाल लिहिला. मला फक्त भूक लागली होती. माझा कोणालाही चावण्याचा हेतू नव्हता, असे त्यात लिहीण्यात आले होते. त्यानंतर अधिकाऱ्याने मांजरीला तिच्या मालकाकडे एका मजेदार चिठ्ठीसह सुपूर्द केले.




# भारताचा बदलला भूगोल!

भारताची सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७ किलोमीटरने वाढली आहे. म्हणजेच भारताची एकूण सागरी किनारपट्टी आता ११०९८.८१ किलोमीटर इतकी झाली आहे. भारताच्या या वाढलेल्या किनारपट्टीमुळे संशोधक अंचबित झाले आहेत. भारताची सागरी किनारपट्टी वाढण्यामागे अनेक कारणे समोर आली आहेत.

भारताच्या सागरी किनारपट्टीची लांबी ७,५६१.६० किमी इतकी असल्याचे आपण आतापर्यंत शालेय पुस्तकांमधून शिकलो आहोत. तसेच अधिकृत कागदपत्रांमध्येदेखील असाच उल्लेख आढळतो, पण आता भारताच्या सागरी सीमांच्या नवीन गणनेनंतर देशाच्या सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७.२१ किलोमीटर म्हणजेच सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये ऑफशोअर बेटे आणि इतर लहान-मोठ्या बेटांचादेखील समावेश आहे.

**सुधारित किनारपट्टी मोजणीला मान्यता**

ही बेटे जुन्या गणनेत समाविष्ट नव्हती. किनारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या सुधारित आकृतीला एकमताने सहमती दर्शविली आहे. यामुळे भारताच्या भौगोलिक माहितीमध्ये हा मोठा बदल झाला आहे. केंद्रीय नौवहन मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नवीन पद्धत वापरून केलेल्या गणनेनंतर सुधारित किनारपट्टीच्या लांबीला अधिकृतपणे मान्यता देण्यात आली आहे. भारताच्या सागरी किनारपट्टीच्या मोजणीचा वाद २०१० पासून सुरू होता. गृह मंत्रालयाच्या मते, १९७० पासून भारताच्या किनारपट्टीची लांबी ७,५६१ किलोमीटर आहे. विविध सरकारी विभागांनी किनारपट्टीसाठी वेगवेगळे आकडे वापरले आहेत. २०१९ मध्ये या मुद्द्याची तपासणी करण्यात आली. किनारपट्टी संवर्धन आणि विकास सल्लागार समिती २०१० पासून या मुद्द्यावर विचारविनिमय करत होती.

**प्रमाण आणि गणना पद्धतीत बदल**

विद्यमान किनारपट्टीच्या लांबीमध्ये इतक्या मोठ्या फरकाचे मुख्य कारण म्हणजे प्रमाण आणि गणना पद्धतीतील झालेला बदल आहे. वेगवेगळ्या स्केलच्या नकाशांवरून किनारपट्टीची लांबी मोजली जाते, तेव्हा त्यात फरक असू शकतो. नकाशा जितका मोठा आणि स्पष्ट असेल तितका लांबीचा डेटा अधिक अचूक असेल. आता केलेल्या गणनेमध्ये खाडी, किनारी बेटे आणि बेटे यासारख्या विविध रचनांचा समावेश आहे. मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार, भारताच्या किनारपट्टीच्या लांबीमध्ये १,२९८ ऑफशोअर बेटे आणि बेटे समाविष्ट आहेत. यामध्ये १०५९ ऑफशोअर बेटे आणि २३९ बेटे आहेत. भारतातील मुख्य भूमीत समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये गुजरातच्या सागरी किनारपट्टीची लांबी सर्वाधिक आहे. गुजरातची किनारपट्टी २,३४०.६२ किलोमीटर आहे. त्याच वेळी पुदुचेरीच्या किनारपट्टीची लांबी सर्वात कमी म्हणजे ४२.६५ किलोमीटर आहे.



# भेदभाव पडला महागात

पेरु या देशातल्या एका रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. आता हा दंड का बरं ठोठावण्यात आला असावा? एखादा नियम मोडल्याबद्दल त्यांना दंड ठोठाण्यात आला असावा, असं तुम्हाला वाटत असेल तर ते चूक आहे. कारण महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केल्याप्रकरणी रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. पेरुची राजधानी लिमाच्या समुद्रकिनाऱ्यालगत ला रोजा नॉटिका नावाचं रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनाने महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळं मेनूकार्ड तयार केलं. महिलांसाठी तयार केलेल्या मेनूकार्डमध्ये किंमती छापण्यात आल्या नव्हत्या तर पुरुषांना देण्यात येणाऱ्या मेनूकार्डमध्ये पदार्थांच्या नावाशेजारी किंमती छापण्यात आल्या होत्या. मात्र अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. यासाठी रेस्टॉरंटच्या मालकांना ६२ हजार डॉलर म्हणजे जवळपास ४४ लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. महिलांना दिल्या जाणाऱ्या मेनूकार्डमध्ये किंमत न छापण्याबाबत रेस्टॉरंट प्रशासनाचा अजब तर्क आहे. मेनूकार्ड बघताना महिला पदार्थाऐवजी त्याच्या किंमतीकडे जास्त लक्ष देतात. किंमतीचा विचार मनात असल्यामुळे महिलांना जेवणाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे त्यांना किंमत नसलेलं मेनूकार्ड देण्यात येत असल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. हा तर्क योग्य की अयोग्य हे सांगता येत नसलं तरी अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं सांगत लिमामधल्या प्रशासनाने दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. १९८० मध्ये अमेरिकेतल्या लॉस एंजल्समधल्या एका रेस्टॉरंटनेही महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केला होता. याला विरोध झाल्यानंतर रेस्टॉरंट बंद करावं लागलं.

# ... म्हणून ही खिडकी वेगळी



आपण रेल्वेने प्रवास करतो. भारतीय रेल्वेचं जाळं संपूर्ण देशभर पसरलं आहे. दूरवरची अनेक राज्यं रेल्वेच्या या जाळ्यामुळे एकमेकांशी जोडली गेली आहेत. रेल्वेशी संबंधित बऱ्याच बाबी आहेत. पण सध्या आपण रेल्वेतल्या खिडक्यांबाबत जाणून घेऊ. ट्रेनमध्ये खिडकीची जागा पकडायला प्रत्येकालाच आवडतं. पण तुम्ही कधी दाराजवळच्या खिडकीत बसला आहात का? ही खिडकी इतर खिडक्यांपेक्षा थोडी वेगळी असते. डब्यातल्या इतर खिडक्यांना तीन सळ्या असतात. मात्र दाराजवळच्या या खिडकीला चार सळ्या बसवलेल्या असतात. याचं कारण काय, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. दरवाज्याजवळच्या खिडकीतून चोरी होण्याचा धोका बराच जास्त असतो. या खिडकीतून आत हात घालून चोरी होऊ शकते. रात्रीच्या वेळी प्रवासी झोपेत असताना या खिडकीतून चोरी होऊ शकते. चार सळ्या लावल्यामुळे हात आत जाऊ शकत नाही आणि चोरी टळू शकते. याच कारणामुळे या खिडकीला एक अतिरिक्त सळी बसवलेली असते.

# वरातीमुळे न्यू यॉर्कमध्ये वाहतूक कोंडी



भारतात लग्नाची चर्चा होत असताना त्यात वरातीचा उल्लेख नसेल, तर तो विषय अपूर्ण राहतो. खरंतर, आपल्या देशात वरातीशिवाय लग्न पूर्ण होत नाही. वरातीमुळे वाहतूक कोंडी होत नाही आणि नाच करणाऱ्यांना घड्याळात १२ वाजले आहे, हे दाखवत नाही, तोपर्यंत मजा येत नाही. न्यू यार्कमध्येही ४०० वऱ्हाडी मंडळींनी रस्त्यावर घातलेल्या गोंधळामुळे रस्ताच जाम झाला. न्यू यॉर्कमधील वॉल स्ट्रीवर वरातीमुळे वाहतूक बंद पडली होती. यावेळी तब्बल ४०० लोक डीजेच्या तालावर एकत्र नाचत होते.

न्यू यार्कमधील या वरातीत ढोलताशा, डीजेसह सर्व व्यवस्था होती. न्यू यार्कमधील वॉल स्ट्रीटमध्ये यापूर्वी कधीही असा रस्ता बंद झाला नव्हता. भारतीय वरातीमुळे असा चमत्कार घडला असून, वाद्यांच्या तालावर चारशे लोकांनी ठेका धरल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. त्यांच्या या आनंदावर विरजण टाकायला कुणीच तयार नव्हते. ही बतमी व्हयरल झाल्यावर एका यूजरने म्हटले, ४०० लोकांच्या मिरवणुकीसाठी वॉल स्ट्रीट बंद होऊ शकेल, असे कोणाला तरी वाटले असेल? ही निश्चितच आयुष्यात एकदाच अनुभवायला मिळू शकणारी जादू आहे. एका युजरने लिहिले, यांनी यासाठी काही विशेष परवानगी घेतली होती का? दुसऱ्याने लिहिले, हे निश्चितच उत्तर भारतातील लोकांचे वर्तन आहे. अन्य एका युजरच्या मते अशा कारणांसाठीच ट्रम्प या लोकांना हद्दपार करत आहे.

# चित्रविचित्र वस्तूसंग्रहालये

भारतात चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं आहेत. अहमदाबादमधल्या व्हिचर वस्तूसंग्रहालयात बरीच भांडी बघायला मिळतात. या संग्रहालयात चार हजारपेक्षा अधिक भांडी मांडण्यात आली आहेत. ही सगळी भांडी विविध धातूंपासून बनवण्यात आली आहेत. प्राचीन काळातली भांडी इथे पहायला मिळतात. राजधानी दिल्लीत सुलभ आंतरराष्ट्रीय टॉयलेट म्युझियम आहे. इथे वेगवेगळ्या आकाराची शौचालयं पहायला मिळतात. हे संग्रहालय दिल्लीतलं खास आकर्षण आहे. इथे पुरातन शौचालयंही आहेत. हे संग्रहालय के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. दिल्लीतच एक बाहुल्यांचं संग्रहालय आहे. या संग्रहालयात अत्यंत सुंदर आणि आकर्षक बाहुल्या पहायला मिळतात. हे म्युझियमही के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. गुवाहाटीतल्या मायोंग गावात खूपच विचित्र संग्रहालय आहे. या संग्रहालयात मानवी कवट्या तसंच जादूटोण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. जादूटोना संग्रहालय याच नावाने ते ओळखलं जातं.



# सात फेऱ्यांपूर्वीच वधूचा लग्नाला नकार



लग्नाचा मंडप सजवला होता. पुजारी मंत्र म्हणत होते. नातेवाइकांच्या नजरा वधू-वरांवर खिळल्या होत्या. वातावरण आनंदाने भरून गेले होते. पण फक्त सात फेरे शिल्लक असताना वधूने लग्न करण्यास नकार दिला.

आपल्याला हे लग्न करायचे नव्हते, असे तिने स्पष्ट सांगितले. कुटुंब, समाज किंवा नातेवाइकांची पर्वा न करता तिने आपला मुद्दा मांडला. हा निर्णय वधूने इतका अचानक सांगितला की सर्वांनाच धक्का बसला. अनेकांना आश्चर्य वाटले, तर काहींनी तिच्या धाडसाचे कौतुकही केले.

**नेमकं काय घडलं?**

कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील बुवनहल्ली गावात ही घटना घडली. पल्लवी नावाच्या मुलीचे लग्न अलूर तालुक्यातील रहिवासी वेणुगोपालशी निश्चित झाले होते. सर्व नातेवाईक आनंदाने नाचत होते. वर हातात मंगळसूत्र घेऊन उभा होता आणि पुढच्याच क्षणी सात फेरे घ्यायचे होते तेव्हा पल्लवीने हा निर्णय घेतला आणि संपूर्ण वातावरणात शांतता पसरली.

**वधू तिच्या प्रियकरासह ...**

आपले प्रेम दुसऱ्या व्यक्तीवर आहे आणि आपले आयुष्य त्या व्यक्तीसोबतच घालवायचे आहे, असे तिने सांगितले. हे ऐकून मंडपात बसलेले लोक थक्क झाले. काही लोकांना सुरुवातीला काय घडत आहे यावर विश्वासच बसत नव्हता. मुलीच्या पालकांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. नातेवाइकांनीही आपापल्या परीने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, पण पल्लवी डगमगली नाही. नंतर पल्लवीचा प्रियकर पोलिसांसह तिथे पोहोचला आणि वधूला सोबत घेऊन गेला.




# पुरातन ठेवा परत मिळाला

संगीतकार स्टिफन मॉरिस यांना त्यांचं हरवलेलं व्हायोलिन हे वाद्य परत मिळालं आहे. लंडनच्या दक्षिण भागात रेल्वेने प्रवास करताना त्यांचं व्हायोलिन हरवलं होतं. हे व्हायोलिन ३१० वर्षांपूर्वीचं असल्यामुळे मॉरिस यांच्या जीवाची घालमेल सुरू होती. जुन्या काळातलं व्हायोलिन परत मिळू शकत नसल्याने ते खूपच अस्वस्थ झाले होते. मात्र १० दिवसांनी त्यांना व्हायोलिन मिळालं. या पुरातन व्हायोलिनची किंमत थोडीथोडकी नाही. हे वाद्य खरेदी करण्यासाठी तुम्हाला २.५ लाख पाउंड म्हणजे जवळपास २.२८ कोटी रुपये द्यावे लागतील. व्हायोलिनची ही किंमत ऐकून कोणीही उडेल. डेव्हिड टेक्लर यांनी १७०९ मध्ये हे व्हायोलिन तयार केलं होतं. स्टिफन यांनी आपलं व्हायोलिन हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीस कामाला लागते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तपासून त्यांनी आरोपीला ओळखलंही होतं. ही माहिती मिळताच फक्त २४ तासांमध्ये आरोपीने स्टिफन मॉरिस यांच्याशी ट्विटरवरून (एक्स) संपर्क साधला आणि व्हायोलिन परत देणार असल्याचं सांगितलं. ठरवलेल्या ठिकाणी रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी स्टीफन यांना व्हायोलिन मिळालं. व्हायोलिन परत केल्यामुळे आरोपीला ताब्यात घेणार नसल्याचं लंडन पोलिसांनी सांगितलं.

## राज्य रस्ते परिवहन महामंडळ राबविणार

# एसटी पास थेट तुमच्या शाळेत मोहिम

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :

शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही मोहिम राबविण्यात येणार असून आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळा-महाविद्यालयात वितरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्ये रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळ १६ जुन पासून सुरू होत आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो.



त्याचप्रमाणे शासनाच्या "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते.

यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही.

### थेट शाळेत मिळणार एसटीचा पास

राज्यभरात दररोज सरासरी ८ ते ९ लाख विद्यार्थी-विद्यार्थिनी एसटीने प्रवास करतात. गेल्यावर्षी एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आली होती. यावेळी एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत २४ लाख ५५ हजार विद्यार्थिनींनी पास घेतला होता. याच कालावधीत एकूण २९ लाख ४८ हजार विद्यार्थ्यांनी पास काढला होता.

त्यांच्या शाळा - महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा शैक्षणिक वेळ वाया जाणार नाही.

एसटी महामंडळाच्या माध्यमातून "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम १६ जुन पासुन राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन पासची आवश्यकता असणाऱ्या शाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे.

या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार असल्याचेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले आहे.

## गोळ्या घालून तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, खापा, दि. १५ :



जुन्या वैमनस्यातून एका तरुणाने त्याच्या प्रतिस्पर्धी तरुणाची भरदिवसा गोळ्या घालून हत्या केली. मृत चेतन अशोक गगाटे (२८) हा हनुमान घाट खापा येथील रहिवासी आहे आणि आरोपी अर्जुन शेषराव नीले (२८) हा खापा येथील रहिवासी आहे. ही घटना रविवार, १५ जून रोजी सकाळी ११:०० वाजता बाजार चौकात घडली. हत्येनंतर अर्जुनने खापा पोलिस ठाण्यात आत्मसमर्पण केले.


माहिती मिळताच खापा पोलिस अधिकारी विशाल गिरी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत चेतनच्या कुटुंबीयांनी चेतनला उपचारासाठी मॅक्स हॉस्पिटल नागपूर येथे नेले. तिथे डॉक्टरांनी चेतनला मृत घोषित केले. मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी मेडिकल हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, चेतन आणि अर्जुनमध्ये अनेक वर्षांपासून वैमनस्य होते. काही वर्षांपूर्वी चेतनने मंडीच्या जत्रेत अर्जुनवर हल्ला केला. यामध्ये अर्जुन गंभीर जखमी झाला होता, ज्यामध्ये पोलिसांनी चेतनविरुद्ध गुन्हा दाखल केला. कालांतराने दोघांमधील वैमनस्य वाढत गेले. घटनेच्या दिवशी चेतन डॉक्टर बन्सी तुमाने यांच्या क्लिनिकच्या गल्लीतून जात होता. त्यानंतर अर्जुन हातात पिस्तूल (मौसर) घेऊन तिथे पोहोचला. चेतनला पाहताच अर्जुनने त्याच्यावर तीन गोळ्या झाडल्या. चेतन जमिनीवर पडला. पोलिसांनी गुन्ह्याच्या ठिकाणाचा पंचनामा केला आणि जमिनीवर पडलेले पिस्तूल आणि तीन रिकामे काडतुसे जप्त केली. नागपूर जिल्हा ग्रामीण अतिरिक्त पोलिस अधीक्षक रमेश धुमाळ आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर अनिल म्हस्के यांनी गुन्ह्याच्या ठिकाणाची पाहणी केली. खापा पोलिसांनी आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला.

## १५ शिक्षकांकडून घेतले प्रत्येकी १५ लाख

### शालार्थ आयडी घोटाळ्यात संस्थाचालक धोटेला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये रोज नवनवीन प्रकरणे समोर येत आहेत. यात आता अधिकाऱ्यांनंतर संस्थाचालकांना अटक केली जात आहे. शनिवारी विशेष तपास पथकाने मोठी कारवाई केली आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात शनिवारी विठ्ठल रुक्मिणी शिक्षण संस्थेचे संस्थाचालक दिलीप धोटे यांना विशेष तपास पथकाने अटक केली. धोटे यांनी १५ शिक्षकांचे बनावट शालार्थ आयडी तयार करून त्यांना नोकरी दिल्याचा आरोप आहे. तसेच प्रत्येकाकडून त्यांनी १५ लाख रुपये घेतल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.



याआधी पोलिसांनी चरण चेटुले (६३, भंडारा) यांना अटक केली होती. आता दिलीप धोटे यांची यांना अटक करण्यात आली आहे. धोटे यांनी १५ शिक्षकांची नियुक्ती केल्याचा आरोप आहे. यासोबतच त्यांनी राजाबक्षा येथील नवयुवक प्राथमिक शाळेत या शिक्षकांना नियुक्ती दिली. या शिक्षकांचे नियुक्ती विठ्ठल रुक्मिणी संस्थेत झाली असली तरी त्यांना वेगळ्याच शाळेत नोकरी देण्यात आली. एसआयटी प्रमुख सुनीता मेश्राम यांनी सर्व शिक्षकांना बोलावून त्यांचा जबाब नोंदवला. यात शिक्षकांनी १५ लाख रुपये धोटे यांना दिल्याची कबुली दिली. सोबतच त्यांना मिळत असलेल्या वेतनातून काही पैसे धोटे ठेवत असल्याचा आरोप केला आहे.

धोटे यांनी १५ शिक्षकांचे बनावट शालार्थ आयडी तयार करून नियुक्ती दिल्याचा आरोप आहे. प्रत्येकाकडून १५ लाख रुपये घेतल्याची कबुली शिक्षकांनी दिली आहे. या आरोपाखाली त्यांना अटक करण्यात आली.

### आगीत दोघांचा जळून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

महाल येथील एका निवासी बहुमजली इमारतीतील गोदामाला रात्री लागलेल्या आगीत दोघांचा जळून मृत्यू झाला. दुकानमालक गिरीश खत्री (वय ३५), विठ्ठल धोटे (वय २५) अशी मृतकांची नावे असून गुणवंत दिनकर नागपूरकर (वय २८) असे जखमीचे नाव आहे. या घटनेने महाल परिसरात खळबळ माजली आहे. महाल येथील गांधीगेटजवळ जयकमल कॉम्प्लेक्स ही पाच मजली इमारत असून पहिल्या माळ्यावर गोदाम आहे. यात कोल्ड फायर पायरो, विद्युत दिव्यांच्या माळा, हॅलोजन लाईट व इतर विद्युत साहित्य ठेवले होते. दरम्यान गोदामात ज्वलनशील साहित्य अधिक असल्याने आगीने रौद्ररुप धारण केले.

## दिव्यांग, वृद्ध, रुग्णांनी मानले नितीन गडकरी यांचे आभार

### जनसंपर्क कार्यक्रमाला गर्दी, निवेदने स्वीकारून नागरिकांशी साधला संवाद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

नागपूर - केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. या कार्यक्रमादरम्यान विविध सामाजिक घटकांनी ना. नितीन गडकरी यांची भेट घेऊन आपल्या अडचणी, समस्या आणि मागण्या मांडल्या. कार्यक्रमात दिव्यांग नागरिक, वृद्ध महिला-पुरुष, सामाजिक व धार्मिक संस्था, तसेच वैयक्तिक व संस्थात्मक पातळीवरील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. दिव्यांग बांधवांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी तसेच सुविधा मिळवण्यासाठी निवेदन दिले. काहींना कृत्रिम अवयव देण्याचे निर्देश गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिले. अनेक वृद्ध नागरिकांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी अर्ज सादर केले. काहींनी वृद्धापकाळातील आधार योजनांबाबत मार्गदर्शनाची मागणी केली.



विविध संस्थांचे प्रतिनिधी आपल्या संस्थांच्या अडचणी घेऊन यावेळी आले होते. काहींनी निधी, जागा किंवा परवानग्यांसंबंधी समस्या मांडल्या. सामाजिक व धार्मिक संस्थांनी त्यांच्या समुदायातील प्रश्न तसेच उपक्रमांसाठी मदतीची विनंती करणारी निवेदने दिली. गडकरी यांनी सर्व नागरिकांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकून घेतले आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. या कार्यक्रमात एक भावनिक क्षणही पाहायला मिळाला. नितीन गडकरी यांच्या सहाय्यामुळे हृदयशस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या काही रुग्णांनी खास त्यांची भेट घेऊन आभार मानले. गडकरी यांनी या रुग्णांशी संवाद साधत त्यांना पुन्हा नवजीवन मिळाल्याचे समाधान व्यक्त केले. 'जनतेच्या मदतीला नेहमी धावून जाणारे मंत्री' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया अनेकांनी दिली.

## ठाकरे एकत्रच्या चर्चेने भाजपमध्ये घबराट : भास्कर जाधव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

उद्धव आणि राज हे दोन भाऊ एकत्र येण्याबद्दल आम्ही आशावादी आहोत. मात्र दोन भाऊ व दोन्ही पक्ष हे एकत्र येणार नाही यासाठी भाजपा प्रयत्न करीत आहे, असा आरोप उद्धवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी येथे माध्यमांशी बोलताना केला. घराघरात भांडणे लावून राजकीय स्वार्थ कसा साधता येईल याचा विचार भाजप करीत आहे. राज व उद्धव ठाकरे एकत्र आले तर महानगरपालिकेच्या निवडणुकीत ५४ टक्के मते या दोन भावांना मिळतील, असा सर्व्हे आहे, त्यामुळे भाजप पूर्ण घाबरलेला आहे, असे जाधव यांनी सांगितले.

शरद पवार गट भाजपमध्ये जाण्यास इच्छुक असल्याची चर्चा आहे. पण, विरोधी पक्षांच्या आमदार, खासदाराबद्दल अफवा पसरवणे आणि भाजपबद्दल लोकांचे प्रेम वाढल्याचा आभास निर्माण करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे, असे सांगत जाधव म्हणाले की,संघ हा नेहमी भाजपच्या बाजूने मैदानात उतरतो. त्यामुळे महापालिका निवडणुकीत भाजपचा प्रचार केल्यास नवल नाही. सर्व जाती, धर्माच्या लोकांना चुचकारायचे. पण, प्रचार मात्र भाजपचा करायचा असा दुटप्पीपणा लोकांच्या आता लक्षात आला आहे. पूर्वी महाराष्ट्र हा दोन गुजराती नेत्यांकरिता पाहिजे होता. आता ते तीन झालेले आहेत. पण भाजपचे हे स्वप्न धुळीस मिळाल्याशिवाय राहणार नाही, असेही जाधव म्हणाले.



नागपूर महानगरपालिकेत आमच्या ताकदीचा आम्हाला अंदाज आहे. हवेत गोळीबार करणारा कार्यकर्ता नाही. यापूर्वी आम्हाला योग्य संधी मिळाली नाही. आमच्या पक्षातील कार्यकर्ते संधीची वाट पाहत आहेत. योग्य संधी मिळाली की ते चमत्कार करून दाखवतील. सहा महिन्यांपूर्वी १५१ जागांचा आढावा घेतला आहे.

## मोदी, शहा, फडणवीस महाराष्ट्रातील ठाकरे ब्रँड कधीही संपवू शकत नाही : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :

विधानसभा निवडणूक ते लांड्यालबाड्या करून जिंकले आहेत, हे सर्व जगाला समजले आहे. आता मुंबई महापालिका जिंकण्यासाठीही त्यांचे तसेच प्रयत्न सुरू आहेत. मात्र, आता जनता सावध असल्याने त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही, असे म्हणत उबाठाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी भाजप नेत्यांना ठणकावले आहे. तर महाराष्ट्र आणि मुंबईतील ठाकरे ब्रँड कोणी, कधीही संपवू शकत नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, आपण मदारी आहोत आणि कोणालाही नाचवू शकतो, असे देवेंद्र फडणवीस यांना वाटत आहे. मात्र, त्यांच्याकडे सत्ता आहे, बिल्डर लॉबी आहे, भ्रष्टाचाराचा पैसा आहे, या जोरावर आपण कोणालाही नाचवू शकतो, असे त्यांना वाटते.



मात्र, हे सर्व तात्पुरते आहे. त्यांच्या तालावर कोणीही नाचत नसून ही सर्व बिल्डर लॉबी आणि भ्रष्टाचारातून मिळालेल्या पैशांमुळे होत आहे. त्यामुळे हे सत्ता असेपर्यंत म्हणजेच तात्पुरते आहे.

संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रात जो ठाकरे ब्रँड आहे, तो मोदी, शहा किंवा दवेंद्र फडणवीस कोणीही संपवू शकत नाही. महाराष्ट्र मुंबईत हा ब्रँड अजिंक्य आणि अपराजित आहे. हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबियांबाबत जनतेची श्रद्धा, आदर आहे. मराठी माणूस, महाराष्ट्रासाठी ठाकरे कुटुंबाने त्याग आणि संघर्ष केला आहे. स्वाभिमानी महाराष्ट्र आणि मराठी माणूस घडवला, त्याची तुलना कशाचीही होऊ शकत नाही, असेही त्यांनी सांगितले.

संजय राऊत म्हणाले की, मोदी, शहा आणि फडणवीस यांनी कितीही मोठी बिल्डर लॉबी आणली, पैशांचे डोंगर उभे केले, तरी ते ठाकरे ब्रँडशी तुलना करू शकत नाही. विधानसभा निवडणूक ते लांड्यालबाड्या करून जिंकले, मुंबई महापालिकेसाठीही त्यांची तीच तयारी सुरू आहे. मात्र, यावेळी जनता अत्यंत सावध असल्याने त्यांचा डाव यशस्वी होणार नाही, असेही संजय राऊत यांनी ठणकावले..

## लोकरंग

### ओसवाल पंप्सची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर खुली

गेल्या तीन आर्थिक वर्षात महसूल वाढीच्या बाबतीत भारतातील सर्वात वेगाने वाढणारी एकात्मिक सौर पंप उत्पादक कंपनी ओसवाल पंप्स लिमिटेडचे आर्थिक वर्ष २०२२ आणि आर्थिक वर्ष २०२४ दरम्यान उत्पन्न ४५.०७ टक्क्यांच्या सीएजीआरने वाढले आहे. त्यांनी त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी रु. १ दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी रु. ५८४/- ते रु. ६१४ किंमतपट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) शुक्रवार, १३ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि मंगळवार, १७ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २४ इक्विटी शेअर्ससाठी बोली लावू शकतात आणि त्यानंतर २४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ८९० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि विवेक गुप्ता यांच्या ८१,००,००० पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा मिश्रण आहे. त्याच्या नवीन इश्यूमधून मिळालेले उत्पन्न, कंपनीच्या काही भांडवली खर्चासाठी निधी देण्यासाठी ८९.८६ कोटी रुपयांपर्यंत; हरियाणातील कर्नाल येथे नवीन उत्पादन युनिट्सच्या स्थापनेसाठी निधी देण्यासाठी तिच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी, ओसवाल सोलरमध्ये इक्विटीच्या स्वरूपात गुंतवणूकीसाठी २७२.७६ कोटी रुपये; कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांच्या अंशतः किंवा पूर्ण, पूर्व-पेमेंट/पुनर्भरणासाठी २८० कोटी रुपये; वापरण्यात येणार आहेत.




### अहमदाबाद विमान अपघातातील बळींसाठी एलआयसीच्या सवलती जाहीर

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या फ्लाइट एआय १७१ मधील प्रवाशांच्या आणि क्रू सदस्यांच्या तसेच जमिनीवरील लोकांच्या मृत्यूबद्दल एलआयसी ऑफ इंडिया तीव्र दुःख व्यक्त करते.एलआयसी ऑफ इंडिया बाधितांना मदत करण्यास वचनबद्ध आहे आणि आर्थिक मदत देण्यासाठी दाव्याचे निपटारे जलद करेल.

एलआयसी ऑफ इंडियाने एलआयसी पॉलिसींच्या दावेदारांच्या अडचणी कमी करण्यासाठी अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. मृत्यू प्रमाणपत्रांऐवजी, विमान अपघातामुळे पॉलिसीधारकाच्या मृत्यूच्या सरकारी नोंदींमधील कोणताही पुरावा किंवा केंद्र/राज्य सरकार/विमान प्राधिकरणांनी दिलेली कोणतीही भरपाई मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारली जाईल. दावेदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि बाधित कुटुंबांना दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील.

अधिक मदतीसाठी दावेदार जवळच्या शाखा/विभाग/ग्राहक क्षेत्राशी संपर्क साधू शकतात.दावेदार आमच्या कॉल सेंटरवर देखील कॉल करू शकतात - ०२२ ६८२७६८२७

### आल्पेनलिबेने भारतातील पहिले लिक्विड चॉको भरलेले पॉप केले लॉन्च





आल्पेनलिबे इक्लेयर्स ही तिच्या समृद्ध, चोको सारखे लिक्विड ने भरलेल्या स्वादासाठी ओळखली जाते आणि अनेक वर्षांपासून ती ग्राहकांची आवडती राहिली आहे. या खास आणि लोकप्रिय चवेला पुढे नेत, आल्पेनलिबे आता घेऊन आली आहे एक नवे रूप, आल्पेनलिबे इक्लेयर्स पॉप, भारतातील पहिली लॉलीपॉप ज्यामध्ये आहे चोको सारख्या लिक्विड भरलेलं. केवळ 5 मध्ये मिळणारी इक्लेयर्स पॉप एक खास स्वादानुभव देते, बाहेरून मऊ आणि चवदार कॅरेमलचा थर आणि आतमध्ये गोडसर, वाहणारा चोको सारखा लिक्विड फिलिंग.

ही लज्जतदार ट्रीट आता अधिक सोयीस्कर आणि सहज खाण्यासारख्या रूपात सादर करण्यात आली आहे, किशोरवयीन आणि तरुणांसाठी, जे कोणत्याही वेळी, कुठेही आपली गोड खाण्याची इच्छा पूर्ण करू इच्छितात. हळूहळू चव घेतली तरी वा एकदम खाल्ली तरीही इक्लेयर्स पॉप स्नॅक्सला एका गोड चोको सारख्या आनंदात बदलतो.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

### एमसीए पुणे येथे बजाज लायटिंगद्वारे एलईडी रूपांतरणासह स्टेडियमला चमक



नावीन्य, कामगिरी आणि शाश्वतता यांचे मिश्रण करून एक ऐतिहासिक पाऊल उचलत, बजाज लाइटिंगने पुण्यातील गहुंजे येथील प्रतिष्ठित महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) स्टेडियमचे पुढील पिढीतील एलईडी फ्लडलाइटिंगसह यशस्वीरित्या अपग्रेड केले आहे. हे केवळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यापेक्षा अधिक आहे. हे क्रीडा प्रकाशयोजना आणि प्रसारण उत्कृष्टतेमध्ये जागतिक मानके स्थापित करण्याच्या भारताच्या तयारीचे एक धाडसी विधान आहे.या परिवर्तनात ब्लास्टर एलईडी, बजाज लाइटिंगची अत्याधुनिक फ्लडलाइटिंग सिस्टम समाविष्ट आहे,जी खेळा च्या मैदानावर एकसमान, चकाकी मुक्त प्रकाशयोजना देण्यासाठी डिझाइन केलेली आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा मानकांनुसार डिझाइन केलेली, प्रकाश व्यवस्था केवळ सुधारित प्रकाशयोजनाच नाही तर खेळाडू, स्टेडियम प्रेक्षक आणि जगभरातील लाखो प्रेक्षकांसाठी एक तल्लीन करणारा अनुभव देखील देते. हा प्रकल्प सीमा ओलांडण्याच्या आमच्या अटल वचनबद्धतेचे प्रतिबिंबित आहे. बजाज लाइटिंगमध्ये, आमचा असा विश्वास आहे की प्रकाशयोजना प्रेरणादायी आणि सक्षम बनवावी. एमसीए स्टेडियमसह, आम्ही केवळ जागतिक दर्जाची प्रकाशयोजनाच दिली नाही तर भारतीय क्रीडा स्थळांच्या भविष्याचा पाया देखील घातला आहे.

## शिक्षकाचा विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. १५ :

छत्रपती संभाजीनगरच्या रांजणगाव शेनपुंजी इथल्या नर्सरी कॉलनीमध्ये धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खाजगी शिकवणीतल्या ४५ वर्षीय शिक्षकाने चौथीतल्या विद्यार्थिनीला अश्लील व्हिडिओ दाखवत लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना १५ जून रोजी सकाळी उघडकीस आली.रांजणगाव शेनपुंजी इथल्या टॉपर क्लासेस या खाजगी ट्युशनमधील ४५ वर्षीय सुभाष जाधव नामक शिक्षकाने चौथीतल्या विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केले आहेत. सुभाष जाधव हा गेल्या दीड वर्षांपासून रांजणगाव शेनपुंजी येथे नर्सरी कॉलनीमध्ये असलेल्या टॉपर क्लासेसमध्ये शिकवतो. तीन दिवसांपासून चौथीतल्या विद्यार्थिनीला अश्लील व्हिडिओ दाखवत या नराधम शिक्षकाने लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात या शिक्षकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड वर्षांपासून रांजणगाव शेपू येथे नर्सरी कॉलनीमध्ये टॉपर क्लासेस या नावाने आरोपीची शिकवणी आहे. एम.ए. इंग्रजी एम.एड असलेल्या सुभाष जाधवसह तीन शिक्षकांनी मिळून ही शिकवणी सुरू केली होती. तीन दिवसांपूर्वी चौथीत शिकणाऱ्या अकरा वर्षीय विद्यार्थिनीला नराधमाने अश्लील व्हिडिओ दाखवत अत्याचार केले.

## भाजप आमदाराचे निवासस्थान जाळण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. १५ :

अतिवृष्टीमुळे शेतीच्या नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने एका शेतकऱ्याने भारतीय जनता पक्षाचे आमदार तथा माजी मंत्री संजय कुटे यांचे निवासस्थान पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला. याबाबतची तक्रार जळगाव जामोद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. यामुळे जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात एकच खळबळ उडाली असून उलटसुलट चर्चेला पेव फुटले आहे.


शेतकऱ्यावर गुन्हा दाखल

प्राप्त माहितीनुसार, काल शुक्रवारी मध्यरात्री आमदार संजय कुटे हे त्यांच्या जळगाव जामोद येथील निवासस्थानी हजर होते. यावेळी संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील शेतकरी विशाल मुरुख याने संजय कुटे यांच्या निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश केला. त्याच्या हातात पेट्रोलची कॅन होती. हाती कॅन घेऊन त्याने मला अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला अद्याप न मिळाल्याने मी आमदारांचा बंगला जाळून टाकतो, असे आमदार कुटे यांच्या सहकारी मंडळींना सांगितले. पेट्रोलची कॅन घेऊन तो बंगल्याच्या प्रवेशद्वारकडे जात असताना कुटे यांच्या स्वीयसहायकाने त्याला वेळीच ताब्यात घेतले. त्याला पकडून जळगाव जामोद पोलिसांच्या स्वाधीन केले. याप्रकरणी पोलिसांनी शेतकरी विशाल मुरुख यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३ , ३५१(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO 2025 DOAWB_1189768**

**Survey, design, fabrication, supply, installation and commissioning of total 5 KVA "ON GRID" Connected rooftop solar PV power plant including comprehensive maintenance contract (CMC) for the period of 3 Years from the date of commissioning.**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Sevarth shetkari producer company Ltd. At Deori Tq Deori Dist Gondia** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website www.smart-mh.org, in tender and procurement section. The last date for submission of online bid is **30/06/2025 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. Gondia**